
## संरक्षण दलांना बळ! शस्त्रास्त्रे, क्षेपणास्त्र खरेदीला मंजुरी



**नवी दिल्ली :** देशाचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संरक्षण खरेदी परिषदेच्या (डीएसी) बैठकीत सुमारे ५२ हजार कोटी रुपयांच्या संरक्षण खरेदी योजनांना तत्त्वतः मंजुरी देण्यात आली आहे. या योजनेंतर्गत लष्कर, नौदल आणि हवाई दलाला अत्याधुनिक शस्त्रे, क्षेपणास्त्रे, अँटी-ड्रोन प्रणाली, हवाई संरक्षण प्रणाली आणि पाळत ठेवणारी उपकरणे उपलब्ध करून दिली जातील. यामुळे देशाची युद्धसज्जता आणि सुरक्षा क्षमता पूर्वीपेक्षा अधिक बळकट होणार आहे. या संरक्षण खरेदी योजनांचा मुख्य उद्देश तिन्ही दलांना आधुनिक तंत्रज्ञान आणि स्वदेशी संरक्षण प्रणालींनी सुसज्ज करणे हा आहे. या अत्याधुनिक प्रणालींच्या समावेशामुळे भारताची राष्ट्रीय सुरक्षा, सीमेचे रक्षण आणि कोणत्याही आव्हानाचे खंबीरपणे सामना करण्याची क्षमता पूर्वीपेक्षा अधिक मजबूत होईल.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक ३४७
www.ramprahar.com

◆ रविवार, ५ जुलै २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


## अंतरंग


शासकीय योजनांच्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्र/२

'रविप्रहर'मध्ये विविध विषयांवरील लेख/४

वैभव सूर्यवंशीचा अखेर टीम इंडियात समावेश/८


# महामुंबईत कोसळधार!

### सखल भागांमध्ये पावसाचे पाणी साचले, वाहतुकीवरही परिणाम



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई शहरासह उपनगरे तसेच ठाणे, पालघर जिल्ह्यात शनिवारी (दि. ४) मुसळधार पावसाने जोरदार हजेरी लावली. त्यामुळे अनेक सखल भागांत पाणी साचून रस्ते व रेल्वे सेवांवरही परिणाम झाल्याचे दिसून आले.

सततच्या पावसामुळे मुंबईत काही ठिकाणी रस्ते खचणे, झाडे कोसळणे आणि वाहतूक कोंडीच्या घटना घडल्या. भांडूप येथे रस्ता खचल्याची, तर कुलाबा परिसरात झाड कोसळल्याची नोंद झाली असून प्रशासनाकडून तातडीने उपाययोजना करण्यात येत आहेत.

शुक्रवारी रात्रीपासून पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे कल्याण, डोंबिवली शहर परिसरातील मुख्य वर्दळीचे रस्ते जलमय झाल्याने या रस्त्यांना नद्यांचे स्वरूप आले. नवी मुंबईसह ठाण्यातही काही भागांमध्ये पाणी साचले होते.

हवामान विभागाने मुंबई, ठाणे, पालघर, रायगडसाठी रेड अलर्ट जारी केला असून ४ ते ६ जुलैदरम्यान अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. त्यामुळे नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नये, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

**वसई-विरार जलमय**

वसई-विरार शहरात मुसळधार पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला. शहरातील बहुतांश भाग जलमय झाले. या पुराचा फटका ग्रामीण भागालाही मोठ्या प्रमाणावर बसला आहे. दरम्यान, वसई पूर्वेकडील सकवार येथे पुरात अडकलेल्या १३ नागरिकांची प्रशासनाने वेळीच धाव घेत सुखरूप सुटका केली.

मुंबई-अहमदाबाद महामार्गालगत असलेल्या वसई पूर्वेच्या सकवार भागात पावसाचे प्रचंड पाणी साचले. या पाण्यात विरार येथे राहणारे १३ नागरिक अडकून पडले होते. या घटनेची माहिती मिळताच वसई-विरार महापालिका, तहसील कार्यालय आणि पोलीस प्रशासनाने घटनास्थळी अग्निशमन दलाच्या जवानांना पाचारण करून बोटीच्या सहाय्याने सर्व १३ जणांना सुखरूप बाहेर काढले. दरम्यान, नालासोपाऱ्यातही जोरदार पावसामुळे काही भागांमध्ये पाणी साचून जनजीवनावर परिणाम झाला.

**पालघरमध्ये जोरदार पर्जन्यवृष्टी**

पालघर तालुक्यात शुक्रवारी सायंकाळपासून मुसळधार पावसाने जोर धरला असून दिवसभरात ९८ मिलिमीटर पावसाची नोंद झाली, मात्र पालघर शहरात तब्बल ३०५ मिलिमीटर पावसाची नोंद झाली असून जनजीवन विस्कळीत झाले.

### मुख्यमंत्र्यांकडून नागरिकांना आवाहन

मुंबई, ठाणे, पालघर, रायगडसह महाराष्ट्रातील इतर काही जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस कोसळत आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधत महत्त्वाची माहिती दिली. ते म्हणाले, राज्याच्या विविध भागांत मुसळधार पाऊस होत आहे. कालपासून शासनाकडून लोकांना वेगवेगळे अलर्ट देण्यात आलेले आहेत. विशेषतः ६ तारखेपर्यंत अतिशय मुसळधार पाऊस असेल. वादळही येऊ शकते, अशी शक्यता आहे. एनडीआरएफ, एसडीआरएफ आणि आपत्ती व्यवस्थापन कक्ष प्रत्येक गोष्टीवर नजर ठेवून आहे. ज्या ज्या ठिकाणी अडचणी येत आहेत, त्या सोडण्याचा प्रयत्न केला जात आहे. लोकांनी शासनाचे अलर्ट पाहूनच शक्यतो घराबाहेर पडावे, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केले.

### कलावंतांच्या रखडलेल्या मानधनाचा मुद्दा विधिमंडळात

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रश्नावर सुधारणा व कार्यवाहीचे शासनाकडून आश्वासन

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल कलावंतांना देण्यात येणाऱ्या मासिक अर्थसहाय्य योजनेच्या अंमलबजावणीतील त्रुटी, रखडलेले मानधन आणि पात्र कलाकारांना लाभ मिळण्यात होत असलेल्या अडचणींचा मुद्दा आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्नाद्वारे दाखल केला. यासह त्यांनी राज्यातील हजारो कलावंतांच्या प्रलंबित प्रश्नाला विधिमंडळात वाचा फोडत शासनाचे लक्ष वेधले.



विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन

आमदार प्रशांत ठाकूर यांनी दाखल केलेल्या तारांकित प्रश्नात मुंबई, जालना, लातूर, परभणी आणि बुलढाणा जिल्ह्यांतील विविध क्षेत्रातील अनेक वृद्ध कलावंतांचे दरमहा मिळणारे पाच हजार रुपयांचे मानधन आधार कार्ड पडताळणी (केवायसी) न झाल्यामुळे प्रलंबित असल्याची बाब निदर्शनास आल्याचे नमूद केले. संगीत, नाटक, लोककला, चित्रकला, शिल्पकला आणि नृत्य क्षेत्रातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल कलाकारांसाठी शासनाची मासिक अर्थसहाय्य योजना कार्यान्वित असून वर्षभरात सुमारे ३४ हजार पात्र कलाकारांना दरमहा पाच हजार रुपये देण्याचा शासनाचा निर्णय असल्याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

सन २०२४मध्ये योजनेतील पूर्वीची 'अ', 'ब', 'क' आणि 'ड' ही श्रेणी पद्धत रद्द करून सर्व पात्र कलाकारांना समान लाभ देण्याचा निर्णय घेण्यात आला, मात्र त्यानंतर लाभार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने जिल्हास्तरावरील अर्ज छाननीदरम्यान पात्रतेच्या निकषांबाबत विसंगती निर्माण झाली असून अनेक पात्र कलाकार लाभापासून वंचित राहत असल्याच्या तक्रारी समोर आल्याचे आमदार ठाकूर यांनी म्हटले. या पार्श्वभूमीवर शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे का, लाभार्थ्यांना वेळेत अर्थसहाय्य मिळावे, केवायसीमुळे होणारा विलंब टळावा तसेच पात्रतेचे निकष अधिक सुलभ आणि पारदर्शक करण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली आहे किंवा प्रस्तावित आहे, याबाबतही त्यांनी शासनाकडे स्पष्टीकरण मागितले.

राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी या प्रश्नावर दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले की, राज्य शासनाने विविध वैयक्तिक लाभाच्या योजनांचा निधी लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्याचे धोरण आहे. या धोरणानुसार राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ कलावंत व साहित्यिक मानधन योजनेमधील लाभार्थ्यांना मानधन थेट अदा करण्यात येते. मुंबई, जालना, लातूर, परभणी, बुलढाणा या जिल्ह्यातील एकूण पात्र लाभार्थी ५३२३ इतके असून त्यापैकी ४६६५ इतके कलावंतांची डीबीटी अंतर्गत नोंदणी पूर्ण झालेली आहे. या कलावंतांना नियमित मानधन अदा करण्यात येते. तथापि, उर्वरित कलावंत ६५८ यांची वैयक्तिक आधार पडताळणी व बँक सिंडीग न झाल्यामुळे मानधन अदा करण्यात आले नाही. वैयक्तिक आधार पडताळणी व बँक सिंडीग कालवंत यांच्याकडून झाल्यावर त्यांना मानधन देण्यात येईल.

संगीत, नाटक, लोककला, चित्रकला, शिल्पकला व नृत्य क्षेत्रातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल कलाकारांना शासनामार्फत दरमहा आर्थिक मदत देण्याची योजना कार्यान्वित असून या योजनेंतर्गत वर्षभरात सुमारे ३४ हजार कलाकारांना दरमहा रुपये पाच हजार इतके अर्थसहाय्य देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे तसेच सन २०२४मध्ये योजनेतील पूर्वीची श्रेणी पद्धत (अ, ब, क, ड) रद्द करून सर्व पात्र कलाकारांना सरसकट लाभ देण्याचा निर्णय घेतल्यामुळे लाभार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. (पान २ वर..)

## जोरदार पावसाने रायगडला झोडपले

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात सलग चौथ्या दिवशी १०० मिमीपेक्षा जास्त सरासरीने पाऊस पडला आहे. जिल्ह्यात शनिवारी (दि.४) सकाळी ९ वाजेपर्यंत संपलेल्या २४ तासांमध्ये सरासरी १११.२६ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. या पावसामुळे काही ठिकाणी घरांचे नुकसान झाले आहे, तर उरण तालुक्यातील चिरनेर येथे काही घरांमध्ये पुराचे पाणी शिरले.

### काही ठिकाणी घरांचे नुकसान; जनजीवन विस्कळीत

सतत पडणाऱ्या पावसामुळे रायगड जिल्ह्यातील नद्यांच्या पाणी पातळीत वाढ झाली. अंबा नदीने धोका पातळी ओलांडली असून कुंडलिका व पाताळगंगा नद्यांनी इशारा पातळी ओलांडली. उर्वरित सर्व नद्यांची पातळी इशारा पातळीपेक्षा कमी होत्या. दरम्यान, पोलादपूर तालुक्यातील सोनारवाडी येथे दरड कोसळल्याने दोन कुटुंबातील सात व्यक्तींना वडघर येथील अंगणवाडीत स्थलांतरित करण्यात आले आहे.

आतापर्यंत पावसात माणगाव तालुक्यामध्ये चार घरांचे अंशतः नुकसान झाले आहे. तळा तालुक्यातील चरई खुर्द आदिवासीवाडी येथे झोपडी पडली. (पान २ वर..)

## निवडक

### 'जैश-ए-मोहम्मद'च्या मॉड्यूलचा पर्दाफाश, आठजण अटकेत

**अहमदाबाद :** गुजरातच्या दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) अनेक राज्यांमध्ये संयुक्त कारवाई करत बंदी घातलेल्या दहशतवादी संघटना दारुल इस्लाम गुजरात जैश-ए-मोहम्मदशी संबंधित एका संशयित मॉड्यूलचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत आठ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तपास यंत्रणांच्या दाव्यानुसार हे मॉड्यूल सीमेपलीकडील सूत्रधारांच्या संपर्कात होते आणि देशविरोधी कारवायांसाठी जाळे तयार करत होते. याचा अधिक तपास सुरू आहे.

### केंद्र सरकारकडून कांदा उत्पादकांना मोठा दिलासा

**मुंबई :** कांदा उत्पादक शेतकऱ्यांना योग्य भाव मिळावा तसेच सरकारी बफर स्टॉक क्षमता अधिक मजबूत व्हावी या हेतूने केंद्राने सरकारी कांदा खरेदीदरात १३ टक्क्यांची वाढ केली आहे. त्यानुसार आता कांद्याचा सरकारी खरेदीदर प्रति क्विंटल १८७५ रुपयांवरून २१२५ रुपये करण्यात आला आहे. सध्या 'नाफेड' आणि 'एनसीसीएफ'मार्फत राखीव साठ्यासाठी कांदा खरेदीची प्रक्रिया सुरू आहे.

## झेनित धबधब्यावर अडकलेल्या शंभर पर्यटकांची सुखरूप सुटका

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

हवामान खात्याने दिलेला रेड अलर्टचा इशारा झुगारून खोपोलीतील झेनित धबधब्यावर मौजमजा करण्यासाठी आलेले सुमारे शंभरहून अधिक पर्यटक ओढ्याला आलेल्या प्रचंड पाण्यामुळे अडकून बसले होते. स्थानिक नागरिक आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी तीन तासांच्या अथक प्रयत्नानंतर सर्वांची सुखरूप सुटका केली.

प्रशासनाने घराबाहेर पडू नका असे आवाहन केले असताना मुसळधार पावसात विविध भागातून सुमारे शंभरहून अधिक पर्यटक मोठ्या संख्येने शनिवारी (दि.४) खोपोली येथील झेनित धबधब्यावर आले होते. या पर्यटकांमध्ये पुरुष, महिला आणि लहान मुलांचादेखील समावेश होता. या ठिकाणी व्यवसाय करणाऱ्या स्टॉलधारकाने पर्यटकांना पावसाचा जोर असल्याने पुढे जाऊ नका, अडकून पडाल अशी सूचना केली होती, मात्र मौजमजा करण्यात आणि सेल्फी काढण्यात गुंग असलेले पर्यटक ओढा ओलांडून पुढे गेले. अखेर ओढ्याला प्रचंड पाणी वाढल्याने पर्यटकांच्या परतीचा मार्ग बंद झाला.

पर्यटक अडकून बसल्याची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे चार जवान घटनास्थळी आले, पण पाण्याला असलेला प्रचंड वेग पाहता रेस्क्यू करताना एखादा पर्यटक वाहून जाण्याची भीती होती. अशावेळी विहारी ठाकूरवाडीतील तरुण अग्निशमन दलाच्या मदतीला पाण्यात उतरले आणि दोरखंडाच्या सहाय्याने पर्यटकांची तिथून सुखरूप सुटका करण्यात आली.



### पांडवकडा धबधब्यात दोन तरुण गेले वाहून

**पनवेल : वार्ताहर**

खारघरमधील पांडवकडा धबधबा परिसरात शनिवारी (दि.४) दोन तरुण पाण्याच्या जोरदार प्रवाहात वाहून गेले.

पहिल्या घटनेत तळोजा फेज १ येथील सागर विहार बिल्डिंगमध्ये राहणारा मोहम्मद (वय २०) हा तरुण पाण्याच्या प्रवाहात बुडाला, तर दुसऱ्या घटनेत मुंबईतील सांताक्रुझ (कलिना कोळीवाडी परिसर) येथील रहिवासी शेण्णोन किनी (वय १९) हा तरुण प्रवाहात वाहून गेला.

अग्निशामक दल आणि संबंधित यंत्रणांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत शोधकार्य सुरू केले, मात्र पाण्याचा तीव्र प्रवाह आणि प्रतिकूल हवामानामुळे बचावकार्यात अडथळे येत असून दोन्ही तरुणांचा शोध सुरू आहे. दरम्यान, प्रशासनाने पर्यटकांना पावसाळ्यात धोकादायक धबधबे, नद्या व जलाशयांमध्ये उतरण्याचे टाळावे तसेच सुरक्षा सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन केले आहे.

### देवकुंड, कुंभे धबधबा, सिक्रेट पॉईंट, ताम्हिणी घाट परिसरात पर्यटकांना बंदी



**माणगाव :** तालुक्यातील देवकुंड धबधबा, कुंभे धबधबा, सिक्रेट पॉईंट आणि ताम्हाणी घाट परिसरात पर्यटकांना ३० सप्टेंबरपर्यंत पूर्णपणे प्रवेशबंदी करण्यात आली आहे. माणगाव उपविभागीय अधिकारी संदिपान सानप यांनी याबाबतचा आदेश जारी केला आहे.

माणगाव पोलीस ठाणे क्षेत्रातील रवाळजे दूरक्षेत्र अंतर्गत भिरा गावच्या हद्दीतील देवकुंड धबधबा, कुंभे येथील धबधबा, सणसवाडी हद्दीतील सिक्रेट पॉईंट तसेच ताम्हिणी घाट हा परिसर पावसाळी हंगामात पुणे-मुंबईसह महाराष्ट्रातील पर्यटकांचे आकर्षणाचे ठिकाण आहे, मात्र ही निसर्गरम्य ठिकाणे दुर्गम भागात असून पावसाळ्यात तेथे अनेक दुर्घटना घडून काही जणांचा जीवही गेलेला आहे. या पार्श्वभूमीवर ३ जुलै ते ३० सप्टेंबर या कालावधीसाठी प्रशासनाने बंदी घातली आहे. (सविस्तर वृत्त पान २ वर..)

## माथेरानमध्ये भव्य वाहनतळ साकारणार; शासकीय भूखंड नगर परिषदेकडे हस्तांतरित

**माथेरान : प्रतिनिधी**

प्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या माथेरानमध्ये वाहनतळाचा मार्ग आता मोकळा झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दस्तुरी नाका येथील २२,३३३.७० चौरस मीटर क्षेत्रफळाचा शासकीय भूखंड वाहनतळासाठी माथेरान गिरीस्थान नगर परिषदेकडे हस्तांतरित करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार महसूल विभागाने या संदर्भातील शासन निर्णय जारी करून जमिनीच्या हस्तांतरणास मंजुरी दिली आहे.



माथेरानच्या दस्तुरी येथील भूखंड क्रमांक एमपी ९३ सीटीएस नं.३ मधील २२,३३३.७० चौमी क्षेत्रफळाची शासकीय जमीन नगर परिषदेकडे वर्ग करण्यात आली आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६मधील तरतुदी नुसार ही जमीन 'भोगवटादार वर्ग २' या धारणाधिकाराने विनामूल्य व महसूलमुक्त स्वरूपात नगर परिषदेला देण्यात आली आहे. हा भूखंड शासकीय अटी शर्थीनुसार हस्तांतरित करण्यात आला आहे. यामुळे येथे येणाऱ्या पर्यटकांची वाहन पार्किंगची मोठी समस्या सुटणार असून भव्य व सुसज्ज वाहनतळ उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

### पर्यटनाला मोठी चालना मिळणार!

माथेरान पर्यटनस्थळ हे संवेदनशील क्षेत्र असल्याने येथे वाहनांना प्रवेश बंदी आहे. त्यामुळे येणाऱ्या सर्व पर्यटकांना आपली वाहने दस्तुरी नाका येथेच उभी करावी लागतात. वीकेण्डला या ठिकाणी जागेअभावी वाहनांची मोठी गर्दी होऊन घाटरस्त्यामध्ये वाहतूक कोंडी होत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात, पण आता तब्बल २२ हजार चौरस मीटरपेक्षाही अधिक जागा वाहनतळासाठी मिळाल्याने पर्यटकांचा प्रवास अधिक सुलभ आणि सुकर होणार असून माथेरानच्या पर्यटनाला मोठी चालना मिळणार आहे.

### युद्धकाळात भारतीय मुत्सद्देगिरी यशस्वी -पंतप्रधान मोदी

**जोधपूर :** अमेरिका-इराण युद्धाचा परिणाम संपूर्ण जगावर झाला आहे, पण भारताने योग्य निर्णय घेतले, रणनीती आखली आणि आपल्या राजकीय शक्तीचा सकारात्मक वापर केला. म्हणूनच भारत या संकटावर मात करण्यात यशस्वी झाला. भारताच्या मुत्सद्देगिरीची ताकद कठीण काळात दिसून आली. म्हणूनच पश्चिम आशियातील युद्धादरम्यान भारताला ४० देशांकडून तेल व इंधन मिळाले, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे.

राजस्थानमधील जोधपूर विमानतळाच्या नवीन टर्मिनलचे शनिवारी (दि.४) उद्घाटन करण्यात आले. यावेळी पंतप्रधान मोदींनी युद्धकाळात भारताने जागतिक अडचणींवर कशी मात केली याबद्दल माहिती दिली.

## सन्मान



**पनवेल :** राष्ट्रीय डॉक्टर दिनाचे औचित्य साधून पनवेल शहरात डॉक्टरांच्या विशेष सत्कार सोहळ्याचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. या सोहळ्यात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना जीवनगौरव सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार होते, परंतु व्यस्त कामकाजामुळे ते कार्यक्रमाला उपस्थित राहू शकले नव्हते. या पार्श्वभूमीवर डॉ. प्रकाश पाटील आणि डॉ. जयश्री पाटील यांनी शनिवारी लोकनेते रामशेठ ठाकूर यांची प्रत्यक्ष भेट घेत त्यांना हे गौरव सन्मानपत्र प्रदान करून यथोचित सन्मान केला. यावेळी महापौर नितीन पाटील, भाजपचे शहर सरचिटणीस रूपेश नागवेकर आदी उपस्थित होते.

# राज्य सहकारी संघाचा निधी सुरु करण्याबाबत महिनाभरात निर्णय घेऊ -मुख्यमंत्री फडणवीस



**मुंबई : प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय सहकार दिनानिमित्त सहकार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्था आणि व्यक्तींचा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचा बंद झालेला निधी पुन्हा सुरु करण्याबाबत येत्या महिनाभरात निर्णय घेऊ, असे आश्वासन दिले.

नरिमन पॉईंट येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे आज भाजपा गटनेते आमदार प्रवीण दरेकर अध्यक्ष असलेल्या महाराष्ट्र राज्य सहकारी संघ आणि सहकारी महाराष्ट्र यांच्या वतीने आंतरराष्ट्रीय सहकार दिनानिमित्त 'सहकार गौरव पुरस्कार सोहळा' आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यात मुख्यमंत्री बोलत होते.

या पुरस्कार सोहळ्याला विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, उद्योग मंत्री उदय सामंत, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, सहकार व गृहनिर्माण राज्यमंत्री पंकज भोयर, मुंबई बँकेचे संचालक व आमदार प्रसाद लाड, वारणा सहकार समूहाचे अध्यक्ष व आमदार विनय कोरे, आ. अभिजित पाटील, आ. चित्रा वाघ, आ. राहुल आवाडे, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर, मुंबई बँकेचे उपाध्यक्ष सिद्धार्थ कांबळे, मार्केटिंग फेडरेशनचे अध्यक्ष रोहित निकम, मुंबई हाऊसिंग फेडरेशनचे अध्यक्ष प्रकाश दरेकर, मुंबई बँकेचे संचालक नितीन बनकर, आनंदराव गोळे, मुंबई जिल्हा बँकेचे कार्यकारी संचालक संदीप सुर्वे, राज्य सहकारी संघाचे उपाध्यक्ष अर्जुनराव बोरुडे, सचिव रामदास मोरे, रायगड प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. यश प्रवीण दरेकर हे उपस्थित होते.

यावेळी सहकार क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या संस्था व व्यक्ती यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभ हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

यावेळी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले कि, सहकार चळवळ अतिशय जुनी आहे. विशेषतः १२५ वर्षांपूर्वी सहकार क्षेत्राचे मर्म महाराष्ट्राने जाणले व हळूहळू वेगवेगळ्या क्षेत्रात सहकार मोठा झाला. पहिली सहकार पेढी १९०४ मध्ये झाली. सहकारातील पहिली ग्रामीण पेढी कोकणातील कणकवलीत सुरु झाली. त्यानंतर भारतात मोठ्या प्रमाणावर सहकार सुरु झाला. देशात सर्वाधिक मजबुतीने सहकार महाराष्ट्रात रुजला गेला. दोन लाखापेक्षा जास्त वेगवेगळ्या सहकारी संस्था महाराष्ट्रात असल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले.

ते पुढे म्हणाले कि, महाराष्ट्र राज्य सहकारी संघाला १०७ वर्ष झाली. मोठी उज्वल परंपरा असलेला सहकारी संघ आहे .त्या माध्यमातून प्रवीण दरेकर यांनी उत्तम काम सुरु केलेय. संघाच्या माध्यमातून सहकाराला नवीन दिशा देण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. त्या दृष्टीने सहकाराच्या क्षेत्रात प्रशिक्षित कार्यकर्ते निर्माण केले पाहिजेत. यासाठी पूर्वी जो शिक्षण निधी मिळायचा तो बंद झाला आहे. तो शिक्षण निधी पुन्हा सुरु झाला पाहिजे. येत्या महिन्याभरात याचा निर्णय घेऊ, असे मुख्यमंत्र्यांनी दरेकरांना आश्वासित केले.

तत्पूर्वी प्रस्तावित सादर करताना महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे अध्यक्ष आ. प्रवीण दरेकर म्हणाले कि, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ १०७ वर्षांपूर्वी स्थापन झाला आहे. मध्यंतरीच्या काळात संघाचे कामकाज ठप्प झालेले. संघाला उर्जितावस्था दिली पाहिजे यासाठी त्याचे नेतृत्व सहकारातील लोकांनी मला दिले. मुख्यमंत्र्यांचे प्रेम, पाठबळ माझ्यासाठी सर्वात मोठे आहे. स्वयं पुनर्विकास योजनेला मुख्यमंत्र्यांनी ताकद दिली. माझ्या अध्यक्षतेखाली दरेकर समिती केली. राज्यातील सहकार अडचणीत आहे. पतसंस्था, अर्बन बँका, ग्राहक संस्था या सर्व क्षेत्राना आधाराची गरज आहे. याबाबत वरिष्ठ पातळीवर बैठक घ्यावी, अशी मागणीही दरेकरांनी मुख्यमंत्र्यांकडे केली. दरम्यान, यावेळी विद्याधर अनास्कर, सहकार राज्यमंत्री पंकज भोयर, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, आ. विनय कोरे, उद्योगमंत्री उदय सामंत यांनीही आपली मनोगते व्यक्त केली.

***महाडच्या शोभा सावंत यांचा गौरव***

*सहकार क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल महाड येथील कै. अण्णासाहेब सावंत महाड को. ऑप. अर्बन बँकेच्या अध्यक्षा श्रीमती शोभा सावंत यांचा आज राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. श्रीमती शोभा सावंत या गेली २० वर्ष कै. अण्णासाहेब सावंत महाड को. ऑप. अर्बन बँकेच्या अध्यक्षा आहेत.*

## माथेरान पालिकेच्या रिक्तपदी कर्मचाऱ्यांची नेमणूक करा

### उपनगराध्यक्ष व गटनेत्यांची मागणी

**माथेरान : बातमीदार**

माथेरान नगरपालिकेत कर्मचारी संख्या कमी झाली असून कामाचा ताण हा उर्वरित कर्मचारी वर्गावर येत आहे.त्यामुळे माथेरान नगरपालिकेमध्ये रिक्त पदांवर कर्मचाऱ्यांची नेमणूक करावी अश्या आशयाचे पत्र माथेरान उपनगराध्यक्ष संतोष शेलार यांनी नगरपरिषद प्रशासन संचालय आयुक्तांना दिले.यावेळी त्यांच्या सोबत पालिका गटनेते शिवाजी शिंदे देखील उपस्थित होते.

माथेरान नगरपालिकेत कर्मचारी संख्या कमी झाली असून नगरपालिकेचे कामकाज करण्यास मोठी तारे वरची कसरत करावी लागत आहे.नगरपालिकेमध्ये एकूण १३ जागा असून त्यापैकी फक्त तीन कर्मचारी काम करीत आहेत.दहा जागा रिक्त असून त्या जागेवर कोणीही कर्मचारी नसल्याने उर्वरित कर्मचारी वर्गावर कामाचा अतिरिक्त ताण येत आहे.ठराविक कर्मचारी

वर्गाला जास्त काम करावे लागत आहे.अश्या प्रकारे माथेरान नगरपालिका चालविणे कठीण झाले असून लवकरात लवकर कर्मचारी वर्गाची नेमणूक करावी अश्या आशयाचे पत्र माथेरान पालिका उपनगराध्यक्षसंतोष शेलार यांनी नगरपरिषद प्रशासन संचालय आयुक्तांना दिले.यावेळी त्यांच्या सोबत पालिका गटनेते शिवाजी शिंदे देखील उपस्थित होते.यावर पालिका आयुक्तांनी सकारात्मक प्रतिसाद देत तीन पदावर तात्काळ कर्मचारी नियुक्ती करतो असे आश्वासन दिले.माथेरान नगरपालिकेत रिक्त झालेली पदे पूर्णपणे भरली गेली पाहिजेत तरच नगरपालिका कामकाज सुरळीत चालेल असे यावेळी उपनगराध्यक्ष संतोष शेलार यांनी आयुक्तांना सांगितले.



## खोपोली, खालापुरात मुसळधार पाऊस ; जनजीवन विस्कळीत



**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली-खालापूरमध्ये दोन दिवस मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळित झाले आह.

खोपोलीच्या लक्ष्मीनगर विणानगर, मुकूंद नगर तसेच शिळफाटा डी सी नगर मध्ये नेहमीप्रमाणे पाणी तुंबला होता मिलगाव, दर्गा, शंकर मंदिर, मल्हारवाडा, व पटेल नगर नदीकडील भाग मोठ्या प्रमाणात पाणी साठले होते ह, पाताळगंगा नदी शिळफाटा टेम्पो पार्किंग एरिया हनुमान मंदिर शेजारी पाणी साठून तळाचे रुप आले होते. गुरुद्वारा वीणानगर पटेल नगर, खालची खोपोली येथेही सखल भागात पाणी साचले होते.मुंबई पुणे जुन्या महामार्गावरील कलोते रयते येथे महामार्गावर गुडघाभर पाणी साठल्याने वाहतूक कोंडी झाली होती. त्यामध्ये खाजगी बस बंद पडल्याने वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. महामार्ग यंत्रणेने क्रेनच्या साह्याने बस बाजूला केली आणि वाहतूक पुर्वपदावर आली. मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्गावर खोपोली युनिमाउंट रेसिडेन्सी समोर शिळफाटा दिशेने जाणारी लेन पूर्णपणे बंद झाली होती.

सावरोली-खालापूर मार्गावरील पुलाला पाताळगंगा नदीला पुर आल्याने पुलाला पाणी लागले होते. खोपोली शहरात बहुतेक सखल भागात मोठ्या प्रमाणात पाणी साठल्याने जनजीवन विस्कळीत झाले होते.

## देवकुंड, कुंभे धबधबा, सिक्रेट पॉईंट, ताम्हिणी घाट पर्यटनस्थळांच्या ठिकाणी प्रतिबंधात्मक आदेश

**माणगाव : रामप्रहर वृत्त .**

माणगाव पोलीस ठाणे हद्दीतील रवाळजे दूरक्षेत्र अंतर्गत, मौजे भिरा गावचे हद्दीतील "देवकुंड धबधबा" व सणसवाडी गावचे हद्दीतील "सिक्रेट पॉईंट" व "ताम्हिणी घाट" हा परिसर पावसाळी हंगामात पुणे-मुंबई व महाराष्ट्रातील पर्यटकांचे आकर्षणाचे ठिकाण आहे. ही ठिकाणे नैसर्गिक दुर्गम भागात असल्यामुळे तेथे कोणत्याही सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत.

या कारणांमुळे "देवकुंड धबधबा", "सिक्रेट पॉईंट" व "ताम्हिणी घाट" ही पर्यटन स्थळे पर्यटकांच्या दृष्टीने



सुरक्षित नसल्याने ह्या परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार प्रतिबंधात्मक आदेश माणगाव उपविभागीय अधिकारी संदीपान सानप यांनी दि. ३ जुलै ते दि. ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीसाठी जारी केला आहे.

या दरम्यान पावसामुळे निर्माण झालेले नैसर्गिक धबधब्याचे परिसरामध्ये मद्यपान करणे किंवा मद्यधुंद अवस्थेत प्रवेश करणे, मद्य बाळगणे, मद्य वाहतूक करणे, अनधिकृत मद्य विक्री करणे य उघडया जागेवर मद्य सेवन करणे. पावसामुळे धोकादायक झालेली ठिकाणे, इ. ठिकाणी सेल्फी काढणे व कोणत्याही स्वरुपाचे चित्रीकरण करणे तसेच रहदारीवर परिणाम करणाऱ्या ठिकाणी फोटोग्राफी करणे. पावसामुळे वेगाने वाहणाऱ्या धोकादायक पाण्यात / खोल पाण्यात उतरणे व त्यामध्ये पोहणे. धबधब्याच्या वरील बाजूला जाणे अथवा धबधब्याच्या धोकादायकरित्या पडणाऱ्या पाण्याच्या झोताखाली बसणे. अशी कोणतीही कृती करणे. धरण / तलाव / धबधब्याच्या १ कि.मी. परिसरात दुचाकी / तीन चाकी / चार चाकी / सहा चाकी वाहनांनी प्रवेश करणे (अत्यावश्यक सेवा वगळून), या अशा प्रकारचे वर्तन करण्यास प्रशासनाने बंदी घातली आहे, याची नागरिकांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.


असे आवाहन माणगाव उपविभागीय अधिकारी संदीपान सानप यांनी केले आहे.

## शासकीय योजनांच्या लाभार्थींना हयात प्रमाणपत्रांचे वाटप

**खालापूर : प्रतिनिधी**

केंद्र व राज्य पुरुस्कृत योजना अंतर्गत संजय गांधी निराधार योजना, दिव्यांग लाभार्थी, श्रावणबाळ योजना व इंदिरा गांधी योजनेच्या लाभार्थ्यांना तहसील कार्यालय खालापूर येथे दरवर्षी एप्रिल ते जुलै अखेर हयात प्रमाणपत्र सादर करावे लागते. यावर्षी शासनातर्फे लाभार्थ्यांना ऑनलाईन हयात प्रमाणपत्र काढण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच शासनातर्फे तालुक्यातील सर्व ईसेवा केंद्रावरही ऑनलाईन हयात प्रमाणपत्र काढण्याची सोय उपलब्ध करून दिली आहे.

खालापूर तहसीलदार अभय चव्हाण, यांच्या मार्गदर्शनाखाली संजय गांधी योजना शाखेचे नायब तहसीलदार मिलिंद तिऱ्हेकर व मंडळ अधिकारी खोपोली भरत सावंत यांनी खोपोली नगर परिषद हद्दीतील लाभार्थ्यांचे ऑनलाईन हयात दाखले काढण्यासाठी दिनांक ०१ जुलै २०२६ रोजी जेष्ठ नागरीक सभागृह खोपोली येथे शिबीर आयोजित केले होते. सदर शिबिरात १०० पेक्षा अधीक संजय गांधी निराधार योजना , श्रावणबाळ योजना, दिव्यांग लाभार्थी व इंदिरा गांधी योजनेच्या लाभार्थ्यांनी उपस्थित राहून आपले ऑनलाईन हयात दाखले काढून घेतले. खोपोली मध्ये शिबीर ठेवल्यामुळे खोपोली व जवळपासच्या लाभार्थ्यांनी या कार्यक्रमांत उस्फूर्त प्रतिसाद नोंदविला. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अण्णाभाऊ साठे सेवा संघ खोपोली श्री कुंडले यांचेही खूप सहकार्य झाले. सदर कार्यक्रमास श्री मिलिंद तिऱ्हेकर, नायब तहसीलदार, गणेश कोकाटे, मंडळ अधिकारी भरत सावंत, संदेश पानसरे श्रीमती भूमिका लदगे, ग्राम महसूल अधिकारी, श्रीमती पल्लवी रामटेके, महसूल सहाय्यक, अरुण हातमोडे, महसूल सेवक व श्सचिन पाटील , प्रकाश पाटील हे उपस्थित होते.



रोहा : शहरातील कुंडलिका नदीच्या पात्रात मासे पकडण्यासाठी जाळे (पाग) टाकताना मच्छीमार बांधव.

पान १ वरुन

## जोरदार पावसाने रायगडला झोडपले

महाड तालुक्यात ताम्हाणे येथे झाडाची फांदी पडून एका घराचे अंशतः नुकसान झाले. रोहा तालुक्यातील पिंगळसई येथे झोपडीचे नुकसान झाले. अलिबाग तालुक्यात एका कच्च्या घराचे नुकसान झाले. खालापूर तालुक्यातील कारगाव येथे गोठ्याचे नुकसान झाले. सुदैवान जीवित हानी झालेली नाही.

सलग चार दिवस पावसाने रायगड जिल्ह्याला झोडपून काढले आहे. शनिवारीदेखील पावसाचा जोर कायम होता. दक्षिण रायगडात जास्त पर्जन्यवृष्टी झाली. पोलादपूर तालुक्यात सर्वाधिक २२२ मिमी तर, त्या खालोखाल महाड तालुक्यात १६२ मिमी पावसाची नोंद झाली. पुढील दोन दिवस पावसाचा जोर कायम राहील, असा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. दरम्यान, दमदार पावसामुळे जिल्ह्यातील २८ लघु प्रकल्पांपैकी सहा प्रकल्प शंभर टक्के भरले आहेत.

तालुकानिहाय पाऊस (मिलीमीटरमध्ये)

अलिबाग ७८, मुरुड ११३, पेण ११०, पनवेल ७८.२०, उरण ८२, कर्जत ६८, माथेरान ९२, खालापूर ९२, रोहा ७९, सुधागड ११६, माणगाव १०२, तळा १३३, महाड १६२, पोलादपूर २२२, श्रीवर्धन ७७, म्हसळा १७६., एकूण पर्जन्यमान १७८०.२०, सरासरी पर्जन्यमान १११.२६.

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रश्नावर सुधारणा व कार्यवाहीचे शासनाकडून आश्वासन

लाभार्थ्यांच्या अर्जाची छाननी जिल्हास्तरावर होत असताना पात्रतेच्या निकषांबाबत विसंगती व तक्रारी प्राप्त झाल्याने अनेक पात्र कलाकार लाभापासून वंचित राहत असल्याचे निदर्शनास आल्याची बाब खरी असल्याचे सांगून मंत्री अॅड. आशिष शेलार यांनी पुढे लेखी उत्तरात म्हटले की, या विषयाच्या अनुषंगाने माझ्या अध्यक्षतेखाली २४ एप्रिल २०२६ रोजी सर्व संबंधित जिल्हाधिकारी व संचालक, सांस्कृतिक कार्य यांच्यासमवेत बैठक घेण्यात आली. या बैठकीत ज्या कलावंतांना तांत्रिक बाबीमुळे मानधन प्राप्त होण्यात अडचणी येतात, त्या दर अडचणी सोडवणूक करून मानधन सुरू होण्याबाबत तातडीने कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत. पात्रतेचे निकष अधिक सुलभ व पारदर्शक करण्याच्या दृष्टीने मानधन योजना इतर बाबींचा विचार करून योजनेमध्ये सुधारणा करण्याची कार्यवाही शासनाच्या विचाराधीन आहे.

## पहल संस्थेकडून पनवेलमधील जिल्हा परिषद शाळांमध्ये शैक्षणिक साहित्याचे वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण व्हावी तसेच शिक्षणासाठी आवश्यक शैक्षणिक साहित्याची कमतरता भासू नये, या उद्देशाने प्राईम एज्युकेशन हेल्थ लर्निंग सर्व्हिसेस (PEHL) संस्थेच्या वतीने पनवेल तालुक्यातील सात रायगड जिल्हा परिषद शाळांमधील इयत्ता पहिली ते सहावीच्या विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.



या उपक्रमांतर्गत दाभोळवाडी (२६), गंगेचीवाडी (८), बानुबाईचीवाडी (३५), कल्हे (७९), बागेचीवाडी (१०२), माढभवन (१८) आणि कोरळवाडी (१६) येथील एकूण २८४ आदिवासी विद्यार्थ्यांना संपूर्ण शैक्षणिक वर्षासाठी आवश्यक असलेले वह्या, पेन, पेन्सिल, कंपास बॉक्स, रंगसाहित्य व इतर शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबाबत उत्साह, आत्मविश्वास आणि नवचैतन्य निर्माण झाले.

पालकांनीही आपल्या मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी PEHL संस्थेने राबविलेल्या या सामाजिक उपक्रमाचे कौतुक करत संस्थेच्या संचालिका डॉ. अंजना थडाणी यांचे मनःपूर्वक आभार मानले.

सदर उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी PEHL संस्थेचे प्रकल्प समन्वयक मधुकर पुजारी तसेच सामाजिक कार्यकर्ते रत्नाकर घरत यांनी विशेष परिश्रम घेतले.

# जोरदार पावसाचा रेल्वे सेवेवर परिणाम

## लोकल गाड्यांची १५ ते २५ मिनिटे उशिराने वर्दी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबई, नवी मुंबई आणि ठाणे परिसरात सुरू असलेल्या मुसळधार पावसाचा फटका रेल्वे वाहतुकीलाही बसला आहे. हार्बर आणि ट्रान्स हार्बर मार्गावरील लोकल सेवा सध्या १५ ते २५ मिनिटे विलंबाने धावत असून वाशी, नेरूळ, सीबीडी बेलापूर, सीवूड्स, खारघर आणि पनवेल स्थानकांवर प्रवाशांची गर्दी वाढली आहे. रेल्वे रुळांवरील प्रतिकूल परिस्थिती, कमी झालेली दृश्यमानता आणि काही ठिकाणी साचलेल्या पाण्यामुळे लोकल सेवा मंदावली असून प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.



शुक्रवारी मध्यरात्रीपासून मुंबई शहर, उपनगरांसह नवी मुंबई आणि ठाणे परिसरात मुसळधार पाऊस सुरू आहे. शनिवारी दिवसभर पावसाचा जोर कायम राहिल्याने अनेक सखल भाग जलमय झाले. काही रस्त्यांवर पाणी साचल्यामुळे वाहतुकीवर परिणाम झाला असून रिक्षा आणि टॅक्सी सेवाही विस्कळीत झाली. त्यामुळे मोठ्या संख्येने नागरिकांनी रेल्वेचा पर्याय स्वीकारला; मात्र लोकल सेवेत झालेल्या विलंबामुळे स्थानकांवर प्रवाशांची मोठी गर्दी झाली.

हार्बर मार्गावरील सीएसएमटी–बेलापूर लोकल सुमारे २५ मिनिटे उशिराने धावत असल्याची माहिती प्रवाशांकडून मिळत आहे. मध्यरेल्वे प्रशासनाच्या माहितीनुसार, चुनाभट्टी परिसरात रेल्वे रुळांवर पाणी साचल्याने काही गाड्यांचा वेग कमी करण्यात आला आहे. वडाळा–पनवेल मार्गावरील एका लोकलला काही काळ थांबावे लागल्याची माहितीही समोर आली आहे. तसेच कुर्ला, वडाळा आणि चुनाभट्टीदरम्यान काही लोकल वारंवार थांबत असल्याने पनवेलकडे येणाऱ्या आणि जाणाऱ्या प्रवाशांचा प्रवास लांबला आहे.

ट्रान्स हार्बर मार्गावरील ठाणे–पनवेल लोकल सेवाही विलंबाने सुरू आहे. या मार्गावरील गाड्या सरासरी १५ मिनिटे किंवा त्यापेक्षा अधिक उशिराने धावत असल्याने वाशी, नेरूळ आणि पनवेल स्थानकांवर गर्दी वाढली आहे. काही प्रवाशांनी सेवा सुरू असल्याचे सांगितले असले, तरी वेळापत्रक विस्कळीत झाल्याने नियमित प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

दरम्यान, मध्य रेल्वेच्या मुख्य मार्गावरील विक्रोळी परिसरात रेल्वे रुळांवर पाणी साचल्याने तेथे वेगमर्यादा लागू करण्यात आली आहे. त्यामुळे सीएसएमटी–कल्याण, कर्जत आणि खोपोली मार्गावरील लोकल सेवाही मंदावली असून त्याचा परिणाम हार्बर आणि ट्रान्स हार्बर मार्गावरील सेवांवरही होत आहे.

पावसाचा जोर अद्याप कायम असल्याने लोकल सेवेतील विलंब काही काळ सुरू राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे नवी मुंबईतील प्रवाशांनी प्रवासाचे नियोजन करताना रेल्वेच्या अद्ययावत माहितीकडे लक्ष ठेवावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

## उरण तालुक्याला मुसळधार पावसाने झोडपले ; चिरनेरमध्ये पूरसदृश्य स्थिती



**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

३ जूनच्या रात्रीपासून ते ४ जून दुपारपर्यंत कोसळत असलेल्या मुसळधार पावसाच्या पाण्यामुळे उरण तालुक्याला अक्षरशः झोडपून काढले आहे. चिरनेर गावात दोन वर्षानंतर डोंगराच्या वेगाने येणाऱ्या पाण्यामुळे पूर सदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती. पुन्हा एकदा पुराच्या पाण्याचा जोरदार फटका बसला असून, शेकडो नागरिकांच्या घरात पुराचे पाणी घुसून जिवनावश्यक वस्तूंचे अतोनात नुकसान झाले आहे. संसार उपयोगी सामानाबरोबर चीज वस्तूंचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, येथील नागरिक भयभीत झाले आहेत.

यामुळे पुन्हा एकदा चिरनेर गावावर पुराचे संकट ओढावले आहे. येथील शेतजमीनी देखील पाण्याखाली आल्या असून, पाणी निचरा होण्याचे नैसर्गिक मार्ग बंद झाल्यामुळे शेतीजमिनी पाण्याखाली आल्या आहेत. पाण्याचा निचरा होत नसल्यामुळे येथील शेतकऱ्यांची भात शेती पूर्णता पाण्याखाली आली असून, शेतकऱ्यांनी आताच टाकलेले भाताचे बियाणे गेले चार दिवस पुराच्या पाण्यात बुडून गेले आहे. शनिवारी सकाळपासून जोर धरलेल्या पावसात चिरनेर गावातील अनेक नागरिकांच्या घरात पाणी घुसून, मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे.

वाऱ्यासह शुक्रवारी रात्री पासून मुसळधार कोसळणाऱ्या पावसाने सर्वांचीच झोपच उडाली. संपूर्ण चिरनेर गावातील नागरिक, महिला भयभीत झाले होते. दरम्यान कळंबुसरे, मोठीजुई, विंधणे, दिघोडे, वेश्वी पाले आदी गावांनाही पुराचा फटका बसला आहे.

चिरनेरमधील मुख्यत्वे कातळपाडा, मधीलपाडा, रांजणपाडा चिंचपाडा, मुळपाडा, येथे रहिवाशांच्या घरात पाणी शिरून मोठे नुकसान झाले आहे. कातळपाडा हद्दीत येणारी माथेरान ही नवीन वसाहत देखील जलमय होऊन, येथील रहिवाशांच्या घरात पाणी शिरून घरांची तळी झाली आहेत.त्यामुळे नुकसान झाले.

# रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांचा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याशी संवाद

**खारघर : रामप्रहार वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी २ जुलै या दिवशी मुंबई मधील ऑपेरा हाऊस येथील I.I.M.U.N. (India's International Movement to Unite Nations) मुख्यालय येथे शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. या शैक्षणिक भेटीत विशेष संवाद सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण केंद्रीय रस्ते वाहतुक व महामार्गमंत्री नितीन गडकरी हे होते. त्यांनी या संवाद सत्रात विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. मंत्री गडकरी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना शिक्षण नेतृत्व, उद्योजकता, नावीण्य, पर्यावरण संवर्धन, सामाजिक बांधिलकी व राष्ट्र निर्माण या विषयांवर मोलाचे विचार मांडले.

या संवाद सत्रात विद्यार्थ्यांनी करिअर, नेतृत्व, सार्वजनिक जीवन, पायाभूत सुविधा विकास आणि युवकांच्या भूमिकेबाबत विविध प्रश्न विचारले. ना. गडकरी यांनी आपल्या अनुभवांच्या आधारे विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची मनमोकळी उत्तरे देत त्यांना आत्मविश्वास, सकारात्मक दृष्टिकोन आणि जबाबदार नागरिकत्वाचा संदेश दिला.

या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना I.I.M.U.N. च्या कार्यपध्दतीची माहिती मिळाली. हा संपूर्ण अनुभव विद्यार्थ्यांना अत्यंत प्रेरणादायी, ज्ञानवर्धक आणि संस्मरणीय ठरला.



# लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये अधिष्ठापन समारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये चतुर्थ इन्व्हेस्टिचर सेरेमनी (अधिष्ठापन समारंभ) संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य तथा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी (दि.४) झाला. या कार्यक्रमास पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन जयराम पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती.




या सोहळयात विद्यार्थी मंत्रिमंडळाची विधिवत स्थापना करण्यात येऊन नवनियुक्त सदस्यांना कर्तव्यपालनाची शपथ देण्यात आली. सदर सोहळ्याला अनेक मान्यवर उपस्थित होते, ज्यामध्ये रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्यजे. एम. म्हात्रे, शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्या आशा भगत, पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक विकास घरत आणि लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेज (कामोठे)च्या व्यवस्थापन समितीचे सदस्य राजेश गायकर यांचा समावेश होता.

शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांमध्ये रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल (खारघर)च्या प्राचार्य राजअलोनी, लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल (कामोठे)च्या प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे, भागुबाई चांगू ठाकूर विद्ययालय (द्रोणागिरी नोड)चे कामकाज निरीक्षक तथा मार्गदर्शक संतोष चव्हाण आणि शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलच्या मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर उपस्थित होत्या. तसेच रयत शिक्षण संस्थेचे पी.आर.ओ. बाळासाहेब कारंडे, पालक–शिक्षक संघाचेकार्यकारी समिती सदस्य, पालक आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आपल्या अध्यक्षीय भाषणात लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नमूद केले की, नवनियुक्त विद्यार्थी प्रतिनिधींवर त्यांचा दृढ विश्वास आहे. त्यांनी स्पष्ट केले की, ही केवळ पदे नसून ती एक महत्त्वाचीजबाबदारी आहे, जी सर्व विद्यार्थी अत्यंत निष्ठापूर्वक आणि उत्तमरीत्या निभावतील. त्यांनी कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचा उल्लेख रयत शिक्षण संस्थेतील एक अग्रगण्य, शिस्तबद्ध आणि अत्यंत नामवंत शाळा म्हणून केला. शाळेची ही प्रतिष्ठा आणि उज्वल परंपरा भविष्यातही टिकवून ठेवणे ही केवळ विद्यार्थ्यांचीच नव्हे, तर शिक्षक आणि पालकांचीही सामूहिक जबाबदारी असल्याचे सांगत त्यांनी सर्वांना कर्तव्यनिष्ठ राहण्याचे आवाहन केले.

शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेवर प्रकाश टाकताना त्यांनी शैक्षणिक वर्ष २०२५–२६मध्ये दहावीच्या बोर्ड परीक्षेत १००% निकाल मिळवून शाळेचा नावलौकिक उंचावल्याबद्दल तसेच मराठी आणि डेटा–सायन्स या विषयांत विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण मिळवून इतिहास रचल्याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन केले

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे महापौर नितीन पाटील यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या अत्यंत शिस्तबद्ध आणिनियोजनबद्ध कार्यप्रणालीची मुक्तकंठाने दाद दिली. त्यांनी विशेषत्वाने नमूद केले की, रयत शिक्षण संस्थेचे सर्वेसर्वा लोकनेते रामशेठ ठाकूर आणि शाळेचे कार्यक्षम चेअरमन आमदार प्रशांतदादा ठाकूर यांच्या दूरदृष्टीमुळेच हे शक्य झाले आहे. या नेतृत्वाने केवळ आधुनिक आणि जागतिकदर्जाच्या भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यावरच समाधान मानले नाही, तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीणव्यक्तिमत्व विकासावर आणि त्यांच्या निरंतर प्रगतीवर जो विशेष भर दिला आहे, त्याचेच हे अत्यंत गोडआणि यशस्वी फळ आज आपल्याला विविध क्षेत्रांतील यशाच्या स्वरूपात पाहायला मिळत आहे.विद्यार्थ्यांच्या शैक्षणिकगुणवत्तेसोबतच त्यांच्या नैतिक मूल्यांची जोपासना करण्याकडे व्यवस्थापनाने दिलेले लक्ष हे या शाळेच्यायशाचे खरे गमक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

या सोहळ्यात शैक्षणिक वर्ष २०२५–२६मधील इयत्ता १०वीच्या रँक होल्डर्स आणि विषयनिहाय गुणवंत विद्यार्थ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. रंगोत्सव कला स्पर्धेत श्रेणी मिळवल्याबद्दल अनुष्का तावडे हिला लॅपटॉप देऊन गौरविण्यात आले. या सोहळ्यात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्याविष्काराने उपस्थितांची मने जिंकली.

प्राचार्य अविनाश कुलकर्णी, पर्यवेक्षिका शुभांगी ठाकूर आणि शमिका कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी हा कार्यक्रम अत्यंत उत्तमरीत्या पार पाडला.

## करंजाडे येथील कादंबरी वेलनेस सेंटरचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

करंजाडे येथील कादंबरी वेलनेस सेंटरचे उद्घाटन पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक डॉ.अरुणकुमार भगत व शिवाजी गोपाळ घरे (४०k,ISG मेंबर) यांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच मंगेश शेलार, सूरज शेलार (ग्रा. पं. सद्यस्य), डॉ. संकेत पवळे , डॉ. अभिजित भाभड, वेलनेस कोच हेमंत रामधरने, विजय बांगर, संजय बांगर तसेच सर्व वेलनेस कोचचे आणि आरोग्य फॅमिलीतील सर्व सन्माननीय सद्यस्य, तसेच परिसरातील विविध क्षेत्रातील नागरिक यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन झाले.

यावेळी नगरसेवक डॉ.अरुणकुमार भगत यांनी परिसरातील सर्व नागरिकांनी या कादंबरी वेलनेस सेंटरच्या माध्यमातून आपले आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी एक तास इथे येऊन व्यायाम करावा आणि आपले निरोगी आयुष्य जगावे असे सांगून कादंबरी वेलनेस अँड फिटनेस सेंटरचे सर्वेसर्वा वेलनेस कोचं कैलास मुंडे व अनुसया मुंडे यांना शुभेच्छा दिल्या.



## उलवे नोडमधील अतिक्रमणांविरोधात सिडकोची कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

सिडकोच्या अनधिकृत बांधकामे नियंत्रक नवी मुंबई विभागातर्फे अनधिकृत बांधकामांविरोधात कारवाईचा सपाटा लावला आहे. त्यानुसार उलवे नोडमधील सिडको मालकीच्या भूखंडावर अनधिकृतपणे उभ्या राहिलेल्या अतिक्रमणांवर सिडकोच्या अनधिकृत बांधकामे नियंत्रक विभागाने नुकतीच धडक कारवाई करत याठिकाणच्या अतिक्रमणांवर कारवाई केली.



सिडकोच्या या कारवाई मोहिमेदरम्यान उघड्यावरील चिकन मटण विक्रीची दुकाने, आठवडा बाजारातील अनधिकृत स्टॉल, फर्निचर दुकाने, गॅरेजेस, वाहन धुलाई केंद्रे (वॉशिंग सेंटर्स), पक्के शेड, पत्राशेड, जाहिरात फलक, टपऱ्या, नर्सरी तसेच रस्ते, पदपथ व सार्वजनिक जागांवरील अतिक्रमणे निष्कासित करण्यात आली. सिडकोच्या अनधिकृत बांधकामे (नवी मुंबई) विभागामार्फत उलवे नोड येथील सेक्टर क्र. ८, ९, १७, १८ व १९ मध्ये विशेष निष्कासन मोहीम राबविण्यात आली. भर पावसातही सदर मोहीम नियोजनानुसार यशस्वीपणे पार पाडण्यात आली. या मोहिमेदरम्यान उघड्यावरील चिकन मटण विक्रीची दुकाने, आठवडा बाजारातील अनधिकृत स्टॉल, फर्निचर दुकाने, गॅरेजेस, वाहन धुलाई केंद्रे (वॉशिंग सेंटर्स), पक्के शेड, पत्राशेड, जाहिरात फलक, टपऱ्या, नर्सरी तसेच रस्ते, पदपथ व सार्वजनिक जागांवरील अतिक्रमणे निष्कासित करण्यात आली. वरील अतिक्रमणे सिडकोच्या प्रचलित नियमावली व धोरणांचा भंग करून तसेच सिडको महामंडळाची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता उभारण्यात आल्यामुळे त्यांच्यावर निष्कासनाची कार्यवाही करण्यात आल्याचे सिडकोने स्पष्ट केले आहे.

सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या निर्देशानुसार व मुख्य नियंत्रक, अनधिकृत बांधकामे (नवी मुंबई) प्रशांत भंगारे यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाईची ही मोहिम राबविण्यात आली. सदर कारवाईत सिडकोच्या अनधिकृत बांधकामे विभागाचे अधिकारी अमित राजपूत, भूमापक वैभव काळे, स्थानिक पोलीस अधिकारी व सिडको पोलीस पथक, महावितरण विभागाचे अधिकारी, सिडको सुरक्षा रक्षक तसेच महाराष्ट्र सुरक्षा मंडळाचे सुरक्षा रक्षक यांनी सहभाग घेतला. दरम्यान, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातील सुरक्षितता अबाधित ठेवण्यासाठी तसेच सिडकोच्या मालकीच्या जागांवरील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी यापुढेही अशा स्वरूपाच्या विशेष निष्कासन मोहिमा नियमित व सातत्याने राबविण्यात येणार असल्याचा इशारा सिडकोतर्फे देण्यात आला आहे.

## नऊ लाख किमतीचा १८ किलो गांजा हस्तगत

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर पोलीस ठाण्याचा कार्यभार स्वीकारताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांनी अंमली पदार्थांविरोधात धडाकेबाज कारवाई करत तब्बल १८ किलो गांजा जप्त केला आहे. या कारवाईत सुमारे ९ लाख २२ हजार ८० रुपये किमतीचा गांजा जप्त करण्यात आला असून एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.



वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात एक इसम गांजाची विक्री करण्यासाठी येणार आहे. या माहितीची शहानिशा करून त्यांनी पोलीस उपनिरीक्षक देवकते व त्यांच्या पथकाला तात्काळ कारवाईचे आदेश दिले. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि देवकते आणि त्यांच्या पथकाने परिसरात सापळा रचला. संशयित इसम घटनास्थळी येताच त्याला ताब्यात घेऊन झडती घेतली असता त्याच्याकडून विक्रीसाठी आणलेला गांजा आढळून आला.

आरोपीविरुद्ध अंमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. या कारवाईत १८ किलो गांजा जप्त करण्यात आला असून त्याची अंदाजे किंमत ९ लाख २२ हजार ८० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. सदर कारवाईमध्ये पोलीस उपनिरीक्षक देवकते यांच्यासह पोलीस हवालदार बोरसे, पोलीस शिपाई दत्ता जाधव, मोकळ, कराड व इतर कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

## आगरी शिक्षण संस्थेत शालेय पोषण आहार सभा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आगरी शिक्षण संस्थेचे माध्यमिक विद्यालय खांदा कॉलनी नवीन पनवेल येथे शनिवार (दि.४) रोजी इयत्ता ८वीच्या विद्यार्थ्यांच्या पालकांची शालेय पोषण आहार सभा संपन्न झाली या सभेचे अध्यक्ष प्राचार्य पंकज भगत यांनी पालकांचे स्वागत करून त्यांना शाळेतील पोषण आहार संदर्भात माहिती दिली. या सभेत पोषण आहार समिती साठी मेघना नाईक यांची पालक प्रतिनिधी म्हणून निवड करण्यात आली. या सभेत शाळा समिती अध्यक्ष डॉ श्रुती म्हात्रे यांनी नव्याने निवडून आलेल्या पालक प्रतिनिधी यांचे अभिनंदन केले. या सभेचे आयोजन माध्यमिक विभागाचे सहाय्यक शिक्षक किरण वळवी व राहुल जाधव यांनी केले तसेच शितल खानावकर यांनी उपस्थितांचे आभार मानले

# चित्रपट स्टूडिओतील मिनी थिएटर्स... एक वेगळं विश्व

झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक


आज मी जेव्हा परेल येथील राजकमल कला मंदिर स्टुडिओत जातो, तेव्हा अनेक गोष्टीसह तेथील मिनी थिएटरमध्ये 'समिक्षक म्हणून पाहिलेले' अनेक चित्रपट आठवतात...

राजकमल कलामंदिर स्टुडिओ म्हणजे भारतीय चित्रपटसृष्टीचे गौरवशाली वैभव. चित्रपट संस्कृतीतील एक वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट. चित्रपती व्ही. शांताराम यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्वाची सतत आठवण करून देणारी आदर्श अशी वास्तू. तेथे प्रवेश करताच आज व्ही. शांताराम यांच्या अतिशय भव्य तैलचित्राचे होणारं दर्शन अवर्णनीय.

माझ्या या स्टुडिओबाबत आठवणी अनेक. येथील मिनी थिएटरमध्ये 'चित्रपट समिक्षक' म्हणून अनेक चित्रपट पाहिले. यश चोप्रा यांच्या यशराज फिल्म्सचे कार्यालय राजकमल स्टुडिओत असल्याने त्यांच्या चित्रपटाचे प्रेस शो येथेच होत. सकाळी अकरा वाजता अशी ते वेळ ठेवत आणि संपल्यावर स्टुडिओच्या गार्डनमध्ये उंची खाना असे. यशजीच्या 'फासले'चा आम्हा समिक्षकांसाठीचा शो संपल्यावर आम्ही गार्डनमध्ये येताच आम्हाला आश्चर्याचा धक्काच बसला, कारण यशराज फिल्म्सने चक्क बिअर ठेवली होती. चित्रपती व्ही. शांताराम यांच्या कडक शिस्तीत हे बसत नव्हते. म्हणून तर 'पेज थ्री'वर याची बातमी झाली. 'फासले'मध्ये रोहन कपूर आणि फराह असे नवीन चेहरे होते. यशजीचे मशाल, विजय हे चित्रपटही याच मिनी थिएटरमध्ये पाहिले.








सुभाष घई दिग्दर्शित बहुचर्चित 'खलनायक' (१९९३)ची प्रिंट तब्बल दीड तास उशिरा आली (याचे श्रेय मुंबईतील ट्रॅफिक जॅमला), त्यामुळे चोली के पीछे क्या है या नृत्यातील माधुरी दीक्षितच्या ग्लॅमर, शैली, मोहकता आणि क्षमता याबद्दलची उत्सुकता वाढली. राजकमल स्टुडिओतील मिनी थिएटरमधील भव्य दिव्य पडद्यावर माधुरी दीक्षितचे नृत्य अतिशय ग्रेसफुल ठरलं.

आपल्या चित्रपटाच्या प्रेस शोच्या वेळी तो संपल्यावर आम्हा समिक्षकांच्या प्रतिक्रिया जाणून घेण्याची देव आनंदला फार फार हौस होती. खरंतर, 'लुटमार' नंतरचे त्याचे चित्रपट केवळ आणि केवळ त्याच्यावरील अतूट प्रेमाखातर मी पाहिले. याच स्टुडिओतील मिनी थिएटरमध्ये 'गॅन्गस्टर' संपल्यावर बाहेर पडत असतानाच समोर साक्षात देव आनंद उभा. या चित्रपटापेक्षा त्याचे दर्शन प्रसन्न आणि दिलखुलास होते. तेच लक्षात राहिले, पण अख्खा चित्रपट विसरलो. आपला पुत्र केतन देसाई दिग्दर्शित 'अनमोल'च्या शोच्या वेळी मनमोहन देसाई असेच आम्हा सिनेपत्रकारांना भेटायला आले, पण या चित्रपटावर व्यक्त करण्यासारखे काही नव्हतंच. अरविंद सामंत निर्मित आणि महेश कोठारे दिग्दर्शित 'जिवलगा'च्या खेळाला तुषार दळवी, रेशम आवर्जून हजर होते. यांचा हा पहिलाच चित्रपट. त्यामुळे त्यांना असा अनुभव नवीनच आणि वेगळा.

दादासाहेब फाळके चित्रनगरीतील मिनी थिएटरमधील अनुभवही अनेक. संजय लीला भन्साळी दिग्दर्शित 'हम दिल दे चुके सनम' (१९९९) हा तेथे पाहिलेला पहिला चित्रपट. नाट्यमय पटकथेवरील भव्य पडद्यावरील गीत संगीत नृत्याची बहारदार मेजवानी अधिकच खुलली. चित्रपट पाहत असतानाच येत असलेला 'सकारात्मक फिल' हा चित्रपट रसिकांनाही आवडेल याचा जणू सिग्नल देतो. 'जोधा अकबर' चा ट्रेलर संपताच दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर आम्हा समिक्षकांच्या प्रतिक्रिया जाणून घेण्यास उत्सुक दिसला. मी पटकन म्हणालो, पुन्हा एकदा पहायची इच्छा आहे (प्लीज रिपीट). यावर आशुतोष गोवारीकरचा खुललेला चेहरा आजही आठवतोय. काही दिवसांनी येथेच 'जोधा अकबर' पाहिला. तेव्हाही आशुतोष गोवारीकर आवर्जून हजर.

करण जोहर दिग्दर्शित 'माय नेम इज खान' हा चित्रपट वादग्रस्त ठरल्याने त्याचे प्रदर्शन अडचणीत सापडले होते. त्यामुळे त्याच्या समिक्षकांसाठीच्या खेळाला अधिक काळजी घेण्यात आली. एक वेगळाच अनुभव. योगायोगाने म्हणा किंवा अन्य कारणांमुळे म्हणा, या विशेष खेळाला मराठीतील मी एकमेव समिक्षक होतो आणि त्याचा मला या चित्रपटावर एका वृत्तवाहिनीला मुलाखत देताना फायदा झाला. चित्रनगरीत शिरतानाच असलेले हे मिनी थिएटर कालांतराने पाडण्यात आले. हे मिनी थिएटर आधुनिक तंत्रज्ञानयुक्त आणि ऐसपैस असे होते.

नटराज स्टुडिओतील मिनी थिएटरमधील प्रोजेक्शन ऑपरेटर विलास जोशी आणि इतरांशी माझे अतिशय मित्रत्वाचे संबंध होते. त्यामुळे नटराज स्टुडिओतील चित्रीकरण आणि मिनी थिएटरमधील अनेक एक्सलुझिव्ह गोष्टी समजत. राजेश खन्नाच्या अतिशय पडत्या काळात याच मिनी थिएटरमध्ये मेहमूद दिग्दर्शित 'जनता हवालदार' मधील हमसे क्या भूल हुई यह सजा हमको मिली या एकमेव गाण्याचे स्क्रिनिंग येथे होते. विशेष उपस्थिती राजेश खन्ना आणि अन्जू महेंद्र. गाणं एकदा दाखवून झाले, परत एकदा झाले आणि परत एकदा दाखवले. राजेश खन्ना पुन्हा पुन्हा तेच गाणे दाखवायला सांगत होता. त्याच्या पडत्या काळाला ते सुसंगत होते. रात्र बरीच होत गेली. एकवीस वेळा स्क्रिनिंग झाले आणि आपल्या पतीचा शोध घेत घेत डिंपल कपाडिया नटराज स्टुडिओत पोहचली. मोबाईलच्या खूपच अगोदरचा हा काळ.

त्या काळात फिल्मवाल्यांचे काही हुकमी अड्डे असत. तो वेगळा माहितीपूर्ण आणि रंजक विषय) डिंपलने राजेश खन्नाला गाडीत बसवून घेतले तेव्हा हे स्क्रिनिंग थांबले.

फिल्मालय स्टुडिओतील मिनी थिएटरमध्ये अनेक चित्रपट पाहिले. मकरंद अनासपुरेची भूमिका असलेला पहिला हिंदी चित्रपट 'यशवंत' येथेच पाहिला. सलिम अख्तर निर्मित आणि अशोक गायकवाड दिग्दर्शित 'राजा की आयेगी बारात'च्या ट्रायल शोला राणी मुखर्जी आवर्जून आली होती. तिचा हा पहिलाच चित्रपट आणि तिच्या वावरण्यात, एकूणच देहबोलीत नवखेपण आणि उत्सुकता जाणवत होती. मिनी थिएटरमध्ये असे अनुभव प्रामुख्याने येतात.

आर.के. स्टुडिओतील मिनी थिएटर माझ्यासाठी वेगळी आठवण. या स्टुडिओत आपल्याला जायला मिळावे हा स्टुडिओ आपल्याला आतून पाह्यला मिळावा ही माझी अनेक वर्षांपासूनची तीव्र इच्छा, एक मोठं स्वप्नच. लहानपणापासूनच चेंबूर येथून एसटीने चौल (अलिबाग) गावी जाता येताना एसटी बसमधून हा स्टुडिओ पाहत पाहत मोठा झालो. मीडियात आल्यावर अनेक चित्रपट स्टूडिओप्रमाणेच याही स्टुडिओत जायचे सुखद योग आले. अशातच एकदा आर. के. फिल्म निर्मित आणि रणधीर कपूर दिग्दर्शित 'हीना' या चित्रपटाचा आम्हा चित्रपट समीक्षकांसाठीचा खेळ याच आर.के. स्टुडिओतील मिनी थिएटरमध्ये असताना मी शहारून गेलो. अतिशय उत्तम आणि देखणं असं हे मिनी थिएटर माझ्यासाठी वेगळी आठवण ठरले. ज्या वास्तूत आपण बसलोय त्या वास्तूला एकूणच भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासात मोलाचे स्थान आहे याची जाणीव मला संतत होत होती. माझ्या कारकिर्दीतील हादेखील एक वैशिष्ट्यपूर्ण क्षण. राज कपूर आपल्या दिग्दर्शनातील चित्रपटांचे काही भाग, गाणी असं करत करत संपूर्ण चित्रपट याच मिनी थिएटरमध्ये पहात असे ही गोष्ट अतुलनीय आहे आणि त्याच वास्तूत आपण बसलोय हे किती आनंदाचे झाले असेल हे सांगता येणार नाही. तो एक उत्कट अनुभव होता.

फेमस स्टुडिओतील मिनी थिएटरमध्ये अनेक वर्षे जवळपास प्रत्येक आठवड्यात चित्रपट पाहिला (अपवाद अर्थात कोरोना काळ). एखाद्या चित्रपटाच्या खेळाच्या वेळी त्याचा निर्माता दिग्दर्शक आणि कलाकार उपस्थित राहत असे. त्यात एखादा चित्रपट आवडला नसेल तर 'काय बरे बोलायचे, कसं बरं बोलायचे' असा अवघड प्रश्न पडे. फार छान चित्रपट आहे असे म्हणायचे (अर्थात औपचारिकता म्हणून) आणि समिक्षा करताना त्यावर उलटसुलट मते व्यक्त करावी असे कसं हो चालेल? याच स्टुडिओतील मिनी थिएटरमध्ये प्रियांका चोप्राने आशुतोष गोवारीकर दिग्दर्शित 'व्हॉटस युवर राशी' या चित्रपटाचा तिचे पाहुणे आणि आम्ही निवडक सिनेपत्रकारांसाठी आयोजित केलेल्या खेळाला ती स्वतः हजर राहिली, आम्हा प्रत्येकाचे छान हसून स्वागत केले, पण चित्रपटात आवडावे असं फार काही नव्हतंच. मग लक्षात आलं की तिने या खेळाचे आयोजन तिचा तेव्हाचा खास मित्र हरमन बवेजा याच्या प्रमोशनसाठी ठेवला होते.

कालांतराने अंधेरी पश्चिमेकडील यशराज स्टुडिओतील मिनी थिएटरमध्ये यशराज फिल्म्स आणि धर्मा प्रॉडक्शन निर्मित अनेक चित्रपट पहायचा सुखद योग येत आहे. हे मिनी थिएटर अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त आणि उत्तम साऊंड सिस्टीम असणारे असे आहे. अनुष्का शर्माने आपली भूमिका असलेल्या अली अब्बास जाफर दिग्दर्शित 'सुल्तान' (२०१६) या चित्रपटाचा भारतीय क्रिकेट संघासाठीचा विशेष खेळ येथेच आयोजित केला.

चित्रपट स्टूडिओतील मिनी थिएटरमधील एक अतिशय संवेदनशील आठवण म्हणजे, चित्रपती व्ही. शांताराम यांच्या निधनानंतर त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी या मिनी थिएटरमध्ये ठेवण्यात आले होते. मला आठवतंय, मी तेव्हा रिपोर्टिंगसाठी येथे गेलो असता हा दुःखदायक क्षण मी अनुभवला.

चित्रपट स्टुडिओतील मिनी थिएटर माझ्यासाठी अशा विविध प्रकारच्या आठवणीचे क्षण. मीडियात आल्यावर मी कायमच चौफेर वाटचाल सुरू केली आणि तसाच दृष्टिकोन ठेवून 'स्टुडिओतील मुशाफिरी करताना' असं बरेच अवतीभवती पाहिले, त्यात स्टुडिओतील मिनी थिएटरचे विश्व अनुभवले, त्यातील हे काही क्षण. चित्रपट स्टूडिओत चित्रीकरणासह अनेक गोष्टी. त्यात अशी काही मिनी थिएटर्स. कुठे तीस आसन क्षमता असलेली, तर कुठे त्यापेक्षा कमी जास्त आसन क्षमता असलेली. तसं पाहिलं तर, कुलाबा येथील ब्लेझ मिनी थिएटरपासून मुंबईत अनेक मिनी थिएटर आहेत. त्यातील अनेक आज काळाच्या पडद्याआड गेली आहेत...

## रोजगार हमीपलीकडे विकसित गावांच्या नव्या युगाची सुरुवात

दोन दशकांहून अधिक काळ ग्रामीण भारताच्या रोजगार सुरक्षेचा आधार ठरलेली मनरेगा योजना आता नव्या स्वरूपात पुढे आली आहे. 'विकसित भारत जी–राम–जी' हा कायदा १ जुलै २०२६पासून देशभर लागू झाला आहे. नुकताच २ जुलै रोजी या योजनेचा केंद्रीय कृषी आणि ग्रामविकास मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या हस्ते देशव्यापी शुभारंभ करण्यात आला. पहिल्या दृष्टीक्षेपात हा बदल केवळ १०० दिवसांच्या रोजगार हमीऐवजी १२५ दिवसांची हमी देणारा वाटू शकतो, परंतु प्रत्यक्षात या कायद्याचा गाभा रोजगारापेक्षा गावाच्या विकास नियोजनात आहे. ग्रामीण भारताच्या विकासाची दिशा, ग्रामपंचायतींची भूमिका आणि विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीची पद्धत बदलण्याचा हा महत्त्वपूर्ण प्रयत्न आहे.



या कायद्यातील सर्वांत मोठा बदल म्हणजे विकसित ग्रामपंचायत आराखडा. आजपर्यंत अनेक गावांमध्ये विकासकामे उपलब्ध निधी किंवा विभागीय योजनांनुसार निश्चित केली जात होती. आता प्रत्येक गावाने स्वतःच्या गरजा ओळखून ग्रामसभेच्या माध्यमातून पुढील काही वर्षांसाठी विकास आराखडा तयार करायचा आहे. गावात पाण्याची टंचाई कोठे आहे, कोणत्या शेतकऱ्यांना सिंचनाची गरज आहे, कुठे शेततळी आवश्यक आहेत, कोणत्या वस्तीला रस्ता हवा, कुठे वृक्षलागवड करायची, पशुपालन, रेशीम उद्योग, मत्स्यव्यवसाय, महिला बचत गट, युवकांचा कौशल्य विकास, तसेच हवामान बदलाशी सुसंगत कामे, या सर्व बाबींचा विचार एकाच आराखड्यात केला जाणार आहे. म्हणजेच आता ही केवळ 'काम शोधून देणारी योजना' न राहता 'विकास नियोजनावर आधारित रोजगार' ही संकल्पना प्रत्यक्षात येणार आहे.

या कायद्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे विविध विभागांच्या योजनांचा समन्वय. आतापर्यंत कृषी, जलसंधारण, ग्रामविकास, वन, पशुसंवर्धन, पंचायत राज, महिला व बालविकास आदी विभागांच्या योजना स्वतंत्रपणे राबवल्या जात होत्या. परिणामी, अनेकदा एकाच गावात विविध विभागांकडून कामे झाली, मात्र त्यांच्यात परस्पर सुसंगती नव्हती. आता विकसित ग्रामपंचायत आराखडा हा सर्व योजनांसाठी समान विकास आराखडा ठरणार आहे. त्यामुळे निधीचा अधिक परिणामकारक वापर होईल आणि निर्माण होणाऱ्या मालमत्ता दीर्घकाळ उपयुक्त ठरतील. हा बदल केवळ प्रशासकीय नसून विकासाच्या विचारपद्धतीतील मूलभूत परिवर्तन आहे.

ग्रामीण मजुरांच्या दृष्टीनेही हा कायदा महत्त्वाचा आहे. रोजगाराची कायदेशीर हमी १०० दिवसांवरून १२५ दिवसांपर्यंत वाढविण्यात आली आहे. कामाची मागणी करूनही विहित मुदतीत रोजगार उपलब्ध झाला नाही, तर बेरोजगारी भत्त्याची तरतूद कायम ठेवण्यात आली आहे. मजुरी वेळेत देणे बंधनकारक करण्यात आले असून विलंब झाल्यास भरपाई देण्याची व्यवस्थाही करण्यात आली आहे. महाराष्ट्रासाठी चालू आर्थिक वर्षातील दैनंदिन मजुरी ३१७ रुपये निश्चित करण्यात आली आहे. त्यामुळे ग्रामीण कुटुंबांच्या उत्पन्न सुरक्षेला अधिक बळ मिळण्याची अपेक्षा आहे.

या कायद्यामुळे ग्रामसभेचे महत्त्वही लक्षणीयरीत्या वाढणार आहे. कोणती कामे करायची, कोणत्या कामांना प्राधान्य द्यायचे आणि गावाचा विकास कोणत्या दिशेने करायचा, याचा निर्णय आता ग्रामसभेतील चर्चेतून होणार आहे. लोकसहभागाशिवाय 'विकसित ग्रामपंचायत आराखडा' प्रभावी ठरू शकत नाही. त्यामुळे ग्रामसभा ही केवळ औपचारिक बैठक न राहता गावाच्या विकासाचे निर्णय घेणारे प्रभावी व्यासपीठ बनणे आवश्यक आहे. विशेष म्हणजे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला, दिव्यांग, भूमिहीन आणि इतर वंचित घटकांच्या गरजांचाही विकास आराखड्यात स्वतंत्रपणे विचार करण्यावर भर देण्यात आला आहे.

या कायद्याचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे तंत्रज्ञानाचा व्यापक वापर. डिजिटल नोंदणी, ई–केवायसी, ऑनलाइन उपस्थिती, जीआयएस–आधारित नियोजन, पोर्टलवर कामांची माहिती, निधी वितरणाचे डिजिटल व्यवस्थापन आणि सामाजिक लेखापरीक्षण यांमुळे पारदर्शकता वाढण्याची अपेक्षा आहे. यामुळे केवळ कामांची नोंद ठेवली जाणार नाही, तर निर्माण झालेल्या मालमत्तेचा प्रत्यक्ष उपयोग, गुणवत्ता आणि परिणामकारकताही तपासता येईल. गावांचा विकास डेटा–आधारित पद्धतीने मोजण्याची संधी या प्रणालीमुळे उपलब्ध होणार आहे.


महाराष्ट्राच्या दृष्टीने या कायद्यात मोठी संधी दडलेली आहे. राज्यात जलसंधारण, शेततळी, सिंचन विहिरी, फळबागा, रेशीम उद्योग, पशुपालन, चारागाह विकास, गाव तलावांचे पुनरुज्जीवन, ग्रामीण रस्ते आणि हवामान बदलाशी सुसंगत शेती यांसारख्या कामांना चालना देता येईल. विशेषतः दुष्काळग्रस्त भागांत पाणलोट विकास, पश्चिम महाराष्ट्रात जलव्यवस्थापन आणि विदर्भ–मराठवाड्यात नैसर्गिक संसाधन संवर्धनासाठी या कायद्याचा प्रभावी वापर होऊ शकतो. रोजगार उपलब्ध करून देतानाच उत्पादनक्षम आणि शाश्वत मालमत्ता निर्माण करण्याची संधी हा या कायद्याचा सर्वांत मोठा लाभ ठरू शकतो.

'विकसित भारत' हे केवळ राष्ट्रीय घोषवाक्य नाही; त्याची सुरुवात प्रत्येक गावातून होणार आहे. त्यामुळे या कायद्याचे यश किती दिवस रोजगार मिळाला यावर नव्हे, तर प्रत्येक गावाने किती सक्षम विकास आराखडा तयार केला, किती शाश्वत मालमत्ता निर्माण केली, ग्रामसभेचा सहभाग किती वाढवला आणि ग्रामीण अर्थव्यवस्था किती सक्षम केली, यावर मोजले जाईल. रोजगार हमी ही या कायद्याची सुरुवात आहे, परंतु विकसित, सक्षम आणि आत्मनिर्भर गावांची निर्मिती हेच त्याचे अंतिम ध्येय आहे.

**–सचिन अडसूळ,**
जिल्हा माहिती अधिकारी,
कोल्हापूर

## रहस्यकथाकार बाबुराव अर्नाळकर

चंद्रकांत सखाराम चव्हाण उर्फ बाबुराव अर्नाळकर यांचा आज स्मृतिदिन. चंद्रकांत चव्हाण हे बाबुराव अर्नाळकर या टोपणनावाने लिहिणारे मराठी लेखक होते. त्यांचा जन्म ९ जून १९०६ रोजी झाला. मॅट्रिकच्या वर्गात असताना शाळा सोडलेले बाबुराव मराठीतील आघाडीचे रहस्यकथा लेखक होते. त्यांनी एकूण १०४२ रहस्यकथा लिहिल्या. खऱ्या अर्थाने त्यांनी तळागाळातल्या माणसांना मराठी वाचनाची गोडी लावली.



बाबुराव अर्नाळकर यांनी चार आणे मालांपासून सुरुवात केली. त्यांचे नायक झुंजार, धनंजय–छोटू, मेजर सुदर्शन, इन्स्पेक्टर दिलीप, दर्यासारंग हे मराठी घरांघरांतून फिरले. तत्कालीन लोकप्रिय कादंबरीकार ना.सी. फडके यांच्या कादंबऱ्यांपेक्षा जास्त प्रमाणात विद्यार्थ्यांनी अर्नाळकरांच्या कादंबऱ्या चोरून वाचल्या. ज्या काळात साने गुरुजी आणि वि.स. खांडेकर यांचे आणि ऐतिहासिक चरित्रांचे वाचन हेच शालेय विद्यार्थ्यांसाठी योग्य समजले जात होते त्या काळात मुखपृष्ठावर पाठीत सुरा खुपसलेला मृतदेह आणि किंचाळणारी स्त्री असली चित्रे असलेली बाबूरावांची पुस्तके चोरूनच वाचली जात.

१९४२च्या चळवळीत तुरुंगात असताना 'सामान्य माणसासाठी लिही' असे बाबुरावांना सांगण्यात आले. सामान्य माणसाकरिता लिहायचे म्हणजे काय हे बाबुरावांना पडलेले कोडे होते. त्यांना नाटकाची आवड होती. एका नाट्यक्लबाचे ते सभासद होते. त्या नाट्यक्लबातून ते एकदा विजयदुर्ग किल्ल्यात गेले आणि परत आल्यावर त्यांनी 'सतीची समाधी' नावाची गोष्ट लिहिली; ती अस्नोडकरांच्या 'करमणूक'मधून प्रसिद्ध झाली. त्याच दिवशी बाबूरावांना नाटककार अच्युत बळवंत कोल्हटकर भेटले. छान गोष्ट आहे, ते म्हणाले. एका मोठ्या माणसाला तुझी गोष्ट खूप आवडली आहे असे म्हणून ते बाबुरावांना नाथ माधव यांच्याकडे घेऊन गेले. नाथ माधवांनी अशाच रहस्यकथा लिही असे सुचवले. बाबुरावांनी मग लेखणी हाती घेतली, ती अखेरच्या श्वासापर्यंत खाली ठेवली नाही.


येरवड्याच्या तुरुंगात असताना विसापूरच्या तुरुंगातील काही राजकीय कैद्यांनी लढा देऊन सर्वच तुरुंगांतील राजकीय कैद्यांना वाचनासाठी पुस्तके पाठवावयास शासनाला भाग पाडले. अशा काही पुस्तकांतून एडगर वॅलेस यांची 'थ्री जस्ट मेन' ही कथा बाबुराव अर्नाळकर यांच्या हाती पडली आणि सामान्यांसाठी काय लिहायचे ते समजले. बाबुरावांचे स्नेही प्रभू हे रहस्यमाला काढीत असत. १९४२च्या फेब्रुवारीत बाबुरावांनी लिहिलेली 'चौकटची राणी' ही पहिली रहस्यकथा पुस्तकरूपाने प्रकाशित झाली. बाबुरावांच्या कथांना पाश्चात्त्य कथांचा आधार असायचा, पण त्या कथांना मराठीत लिहिताना महाराष्ट्रीय वातावरणाचा साज असायचा. कथेत कुठेही अश्लीलपण येऊ न देण्याची खबरदारी बाबुराव घेत आणि कथेचा शेवट नेहमी 'सत्यमेव जयते' असाच असे.

कथेतील प्रसंग वेगळे असले तरी नायक एकच ठेवायचा हे बाबुरावांनी निश्चित केले होते. नायकाचे नाव बाबुरावांना गीता वाचताना सुचले आणि त्यांनी धनंजय हे नाव मुक्रर केले. बाबुरावांचा कथानायक रूबाबदार, सुस्वभावी, समयसूचक आणि धडाडीचा असल्याने वाचकांना त्याच्या गुणविशेषांची, वागण्याची, बोलण्या चालण्याची चांगलीच ओळख असे. अशा या महान रहस्यकथाकाराचे ५ जुलै १९९६ रोजी निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## दुष्टचक्रातून शेतकऱ्यांची होणार कायमची सुटका

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेची अंमलबजावणी सहकार विभाग, बँका यांच्या समन्वयातून अंतिम टप्प्यात आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना कर्जबाजारीपणाच्या दुष्टचक्रातून कायमची सुटका करण्यासाठी, त्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी विविध प्रकारे फायदेशीर अशा तरतुदी शासनाने या योजनेत केल्या आहेत. यापूर्वीच्या लेखात आपण दीर्घकालीन संरचनात्मक सुधारणा, योजनेला दिलेले विचारपूर्वक असे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव, शासनाचा या योजनेमागील दूरदृष्टीकोन पाहिला. आज या योजनेतील तरतुदी पाहूयात...

शाश्वत ग्रामीण अर्थव्यवस्था, शेतकरी कल्याणाचा ३०० वर्षांपूर्वीचा आदर्श या योजनेच्या माध्यमातून प्रत्यक्षात साकारण्यात येत आहे. संपूर्ण कर्जमुक्ती, एकवेळ समझोता आणि नियमित परतफेड करणाऱ्यास प्रोत्साहनपर लाभ ही योजनेची तीन मुख्य स्तंभ आहेत. तब्बल ३६ हजार ५८५ कोटींची राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना कर्जाच्या दुष्टचक्रातून कायमचे बाहेर काढणारी ही योजना आहे. यातून थकबाकीदार शेतकऱ्यांची कर्जमुक्ती होईल. ज्या शेतकऱ्यांनी १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ दरम्यान अल्पमुदत पीक कर्ज घेतले. ज्यांची ३० सप्टेंबर २०२५पर्यंतची थकबाकी ३१ मार्च २०२६पर्यंत थकीत राहिली. अशा शेतकऱ्यांना रुपये दोन लाखांपर्यंत कर्जमुक्तीचा थेट लाभ मिळणार आहे. यामध्ये पीक कर्जाचे पुनर्गठित, फेरपुनर्गठित मध्यम




मुदत कर्जात रूपांतर झालेल्या खात्यांचाही समावेश असेल.

ज्या शेतकऱ्यांनी २०२२–२३, २०२३–२४ आणि २०२४–२५ या तीन आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन वर्षांत घेतलेल्या पीक कर्जाची मुदतीत नियमित परतफेड केली, अशा शेतकऱ्यांना रुपये ५० हजारपर्यंतचा प्रोत्साहनपर लाभ मिळेल. जे शेतकरी प्रामाणिकपणे आणि वेळेवर आपल्या कर्जाची परतफेड करतात, त्यांच्यावर अन्याय होऊ नये याचीही काळजी सरकारने घेतली आहे. अशा नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचा प्रोत्साहनपर लाभ दिला जाणार आहे, पण २०२५–२६ व २०२६–२७मध्ये अल्प मुदत कर्ज घेतले असल्यास अशा कर्जाचीदेखील विहित मुदतीत परतफेड करावी लागणार आहे.

सन २०२३–२४ किंवा २०२४–२५मध्ये अल्प मुदत कर्ज घेतले, फेडलेही. प्रत्यक्ष परतफेडीची रक्कम ५० हजारांपेक्षा कमी असल्यास किमान रुपये पाच हजार किंवा प्रत्यक्ष परतफेड केलेली रक्कम प्रोत्साहनपर लाभ म्हणून दिली जाईल. अशाप्रकारे नियमित कर्ज परतफेड करणाऱ्यांना प्रोत्साहन देण्याचे कामही शासन करत आहे. त्यामुळे वित्तीय शिस्तीला प्रोत्साहन मिळेलच.

ज्या शेतकऱ्यांची एकूण थकबाकी दोन लाखांपेक्षा जास्त आहे, त्यांनी दोन लाखांवरील अतिरिक्त रक्कम बँकेत जमा केल्यास त्यांना उर्वरित रुपये दोन लाखांपर्यंतच्या रकमेचा 'एकवेळ समझोता' अंतर्गत लाभ मिळणार आहे. बऱ्याचदा कर्ज दोन लाखांपेक्षा थोडे जास्त असते आणि शेतकरी योजनेतून बाहेर पडतो, पण यावेळच्या योजनेत तसे नाही. तुमचे कर्ज दोन लाखांहून अधिक असेल, तर वरची अतिरिक्त रक्कम बँकेत भरून या योजनेत सहज सहभागी होऊ शकता.

**–डॉ. श्याम टरके,**
सहाय्यक संचालक (माहिती)

# कर्जतच्या विकासाला चालना देणाऱ्या श्रीराम पुलाचे लोकार्पण

## मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते आणि खासदार बारणेंच्या उपस्थितीत सोहळा






**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात सुमारे दोन–अडीच हजार फार्महाऊस आहेत. त्यामुळे शनिवार–रविवार नव्हे तर नेहमीच वाहतूक कोंडी होत असते. वाहतूक कोंडीची समस्या सुटवी आणि कर्जतच्या विकासाला अधिक चालना मिळावी. यासाठी आमदार महेंद्र थोरवे यांनी उल्हास नदीवरील जुन्या श्रीराम पुलाच्या शेजारी नवीन श्रीराम पूल उभारण्यासाठी प्रयत्न केले. त्या पुलाचे आज लोकार्पण करण्यात आले. सहा कोटी तीस लाख रुपये खर्च करुन हा पूल उभारण्यात आला आहे.

नवीन श्रीराम पुलाच्या उदघाटन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. रोजगार हमीमंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते फीत कापून पुलाचे उदघाट्न करण्यात आले. याप्रसंगी खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेंद्र थोरवे, माथेरानचे नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी, गटनेते संकेत भासे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता संदीप चव्हाण, उप अभियंता राहुल देवांग, मुख्याधिकारी तानाजी चव्हाण, नरेश पाटील,उपसभापती भाई शिंदे, माजी उपसभापती मनोहर थोरवे, नरेश मसणे, भाई गायकर, संभाजी जगताप, विजय पाटील, माजी नगराध्यक्ष शरद लाड, माजी सभापती तानाजी चव्हाण, माजी उपगराध्यक्ष अशोक ओसवाल, दीपक बेहेरे, राजेश भगत, सुदाम पवाळी आदी उपस्थित होते.

कार्यकारी अभियंता संदीप चव्हाण यांनी उपस्थितांचे स्वागत केले. आमदार महेंद्र थोरवे यांनी, 'या श्रीरामपूर भूमिपूजन माझ्या हस्ते झालेल होत. आणि हा श्रीरामपूर व्हावा म्हणून कर्जतकरांची मागणी असताना आज सांगायला अभिमान वाटतोय की ज्या श्रीरामपूलाचे भूमिपूजन आम्ही केलेलं होतं त्या श्रीराम पुलाचे उदघाट्न आमच्या हस्ते या ठिकाणी होत आहे. या गोष्टीचा सार्थ अभिमान आम्हाला आहे. हा पूल कमानीचा असल्याने तो पूर्ण व्हायला थोडा वेळ लागला. जगाची अर्थ व्यवस्था मी पाहिलेली आहेत सिंगापूर असेल मलेशिया असेल थायलंड असेल या सगळ्या देशांची अर्थव्यवस्था ही फक्त आणि फक्त पर्यटनावर चालत असते आणि म्हणून माझ्या कर्जत तालुक्यातील सुद्धा अर्थव्यवस्था ही पर्यटनावर चालावी. यासाठी पर्यटनाला प्राधान्य देण्याचं काम मागच्या पाच – सहा वर्षापासून आपण करीत आहोत.' असे स्पष्ट केले.

खासदार श्रीरंग बारणे यांनी, 'एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्यानंतर आम्ही सगळ्यांनीत्यांच्या नेतृत्वाखाली जाण्याचा निर्णय घेतल्यानंतर खरंतर या संपूर्ण परिसराचा कायापालट झाला यांच्या माध्यमातून या संपूर्ण तालुक्याला मिळाल्यानंतर या तालुक्याचे रस्ते असतील, पूल असतील, पाणी योजना असतील ते करण्याचे काम करण्यात आले. गेल्या अनेक वर्षापासून या तालुक्याचा जेवढा विकास झाला नव्हता तेवढा विकास आपण या सहा – सात सात वर्षांमध्ये प्रामुख्याने झाला. हे नाकारता येणार नाही.' असे सांगितले. रोजगार हमी मंत्री भरत गोगावले यांनी, 'हा पूल उभारण्यासाठी तीन वर्षे लागली असली तरी पुलाचे काम चांगले झाले आहे. रोजगार हमी योजनेचे आता नामांतरण झालेले आहे आणि व्हीव्हीजी रामजी या नवीन संकल्पनेतून आपण आता काम करतोय. या विभागा मार्फत मंगळवारी कार्यशाळा ठेवलेली आहे. आमदार म्हणून तुम्ही आवर्जून उपस्थित राहावे. त्या दिवशी जो उपस्थित असेल त्यालाच प्रथम निधी मिळणार आहे.' असे स्पष्टपणे सांगितले. सूत्रसंचालन अभिषेक सुर्वे यांनी केले.

याप्रसंगी नगरसेवक रामदास गायकवाड, किशोर कदम, वैभव सुरावकर, संतोष शेलार, अरुणा वायकर, कोयल कन्हेरीकर, जान्हवी देवघरे, सुरेखा शितोळे, सुचिता वांजळे, भास्कर दिसले, रत्नाकर बडेकर, अरुण देशमुख, नदीम खान, ज्ञानेश्वर करणूक, दिनेश कडू, योगेश थोरवे आदी उपस्थित होते.

# लोणावळा–खंडाळा घाटमाथ्यावर मुसळधार पावसात एक्सप्रेस वेवरील वाहतूक मंदावली

**खोपोली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यासह खालापूर तालुका आणि खोपोलीला मुसळधार पावसाने झोडपले असून दोन दिवस मोठ्या प्रमाणात पाऊस सगळीकडे पडत आहे त्यातच लोणावळा–खंडाळासह घाटमाथ्यावर सुद्धा जोरदारपाऊस पडत आहे तर या सततच्या पावसाचा परिणाम मुंबई–पुणे एक्सप्रेसवेवरील वाहतुकीवर दिसून येत आहे. मुसळधार पावसामुळे घाटमाथ्यावर दृश्यमानता कमी झाल्याने मुंबई आणि पुणे या दोन्ही दिशेने जाणाऱ्या वाहनांचा वेग मंदावला आहे.

सुरक्षेच्या दृष्टीने अवजड व हलकी वाहने वाहनचालक सावधगिरीने चालवत असल्याने एक्सप्रेसवेवर वाहनांची हालचाल संथ गतीने सुरू आहे. घाट परिसरात पावसाचा जोर कायम असून हा परिसर धुक्याने व्यापले आहे.

बोरघाट महामार्ग प्रशासनाने वाहनचालकांना वेगावर नियंत्रण ठेवण्याचे, सुरक्षित अंतर राखण्याचे आणि पावसाळ्यात आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. हवामान विभागाने पुढील काही तास घाटमाथा परिसरात मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली असून प्रवाशांनी सावधगिरी बाळगण्याचा सल्ला देण्यात आला आहे.



# सरखेल कान्होजी आंग्रे यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

**अलिबाग : प्रतिनिधी**



मराठा आरमाराचे प्रमुख सरखेल कान्होजीराजे आंग्रे यांच्या २९७ व्या पुण्यतिथी निमित्त अलिबाग येथे त्यांना अभिवादन करण्यात आले. भारतीय नौसेनेचे कमांडिंग ऑफिसर कमोडोर प्रशांत चंद्रशेखरन यांनी कान्होजी राजे आंग्रे यांच्या समाधीवर पुष्पचक्र वाहिले. त्यानंतर रायगड पोलिस दलातर्फे मानवंदना देण्यात आली.

अलिबाग नगर पालिका आणि गाज फाउंडेशन यांनी संयुक्तरित्या हा कार्यक्रम अलिबाग शहरातील कान्होजी आंग्रे यांच्या समाधीस्थळी आयोजित केला होता. यानिमित्ताने दरवर्षी अलिबाग नगर पालिका शाळेतील विद्यार्थ्यांची कान्होजी आंग्रे यांच्या पराक्रमावर आधारीत वक्तृत्व स्पर्धा घेतली जाते. स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांची भाषणे झाली

यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे, कान्होजीराजे यांचे वंशज रघुजीराजे आंग्रे, पोलिस अधीक्षक आंचल दलाल, नगराध्यक्षा अक्षया नाईक, उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, भाजपाचे नगरसेवक ॲड. अंकित बंगेरा, शिवसेनेचे संदीप पालकर काँग्रेसचे समीर ठाकूर, शेकापचे अनिल चोपडा, राष्ट्रवादी काँग्रेसचे ॲड. प्रवीण ठाकूर आदिंनी कान्होजी आंग्रे यांच्या समाधीवर पुष्पमाला वाहून अभिवादन केले. यावेळी नगरपालिका कर्मचारी, शिक्षक विद्यार्थी उपस्थित होते.

**नौदलातील संधी, करिअरबाबत मार्गदर्शन**

यानिमित्ताने राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टीलायझर्स लिमिटेडच्या कुरूळ येथील कम्युनिटी सेंटर मध्ये गाज फाउंडेशनच्या माध्यमातून आणि राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टीलायझर्स लिमिटेडच्या सहकार्याने विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले होते.

भारतीय नौसेनेतील करिअरच्या संधी यासंबंधी मार्गदर्शन शिबिरात भारतीय नौसेनेचे कमांडिंग ऑफिसर कमोडोर प्रशांत चंद्रशेखरन यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी नौदलातील संधी आणि करिअर याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

परीसंवादाच्य दुसरया सत्रात कमांडींग ऑफिसर कॅ. विकास दहिया यांनी विद्यार्थ्यांना संबोधीत केले. नौदलाशी संबंधित मार्कोस प्रदर्शनाचे यावेळी उदघाटन करण्यात आले. गाज फाउंडेशनचे अध्यक्ष रघुजीराजे आंग्रे, उपाध्यक्ष डॉ. निशीगंध आठवले, आरसीएफचे कार्यकारी संचालक नितीन हिरडे यावेळी उपस्थित होते.

# मध्य रेल्वेवर पल्स पोलिओ लसीकरण मोहीम ; नऊ हजारहून अधिक बालकांचे लसीकरण

**रोहा : प्रतिनिधी**



मध्य रेल्वेने २९ जुन ते ३ जुलै या कालावधीt सर्व विभागांमध्ये 'पल्स पोलिओ लसीकरण मोहीम' यशस्वीपणे राबवली. ही मोहीम राज्य सरकार आणि स्थानिक महानगरपालिका प्रशासनाच्या समन्वयाने २८ जुन ते ३ जुलै या कालावधीत राबवल्या जाणाऱ्या राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण कार्यक्रमाचा एक भाग आहे. ० ते ५ वयोगटातील मुलांचे संपूर्ण लसीकरण सुनिश्चित करणे आणि 'पोलिओ–मुक्त भारत' घडवण्याच्या देशाच्या संकल्पाला बळकट करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

मध्य रेल्वेच्या कार्यक्षेत्रात एकूण ९०१७ मुलांना पोलिओची लस देण्यात आली. यामध्ये मुंबई विभागात १६४९, पुणे २५५४, भुसावळ १०२०, नागपूर २८७७ आणि सोलापूर विभागात ९१७ मुलांचा समावेश होता. रेल्वेस्थानकांवर लसीकरणासाठी निश्चित केंद्र आणि लसीकरण कक्ष पूर्ण तयारीसह उभारण्यात आले होते. प्रत्येक लसीकरण कक्षामध्ये तोंडावाटे दिली जाणारी पोलिओ लस, कोल्ड–चेन उपकरणे, लस वाहक, आवश्यक साधनसामग्री आणि इतर साहित्याचा पुरेसा साठा उपलब्ध करून देण्यात आला होता.

हा कार्यक्रम सुरळीतपणे राबवण्यासाठी वैद्यकीय अधिकारी, नर्सिंग अधिकारी, पॅरामेडिकल पथके आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांनी परस्पर समन्वयाने काम केले. निश्चित लसीकरण कक्ष, बाह्य संपर्क केंद्रे आणि प्रवाशांची वर्दळ असलेल्या महत्त्वाच्या ठिकाणी ० ते ५ वयोगटातील मुलांना पोलिओची लस देण्यात आली. लसीकरणापासून वंचित राहिलेल्या मुलांपर्यंत पोहोचण्यासाठी घरोघरी जाऊन लसीकरण करण्याची मोहीमही राबवण्यात आली.

या मोहिमेदरम्यान मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्यात आले. कोल्ड–चेनची देखभाल आणि कागदपत्रांची पूर्तता यांवर लक्ष ठेवण्यासाठी वरिष्ठ आरोग्य अधिकारी आणि पर्यवेक्षक पथकांनी प्रत्यक्ष पाहणी केली. ही संपूर्ण मोहीम कोणत्याही विपरीत घटनेशिवाय किंवा व्यवस्थापकीय व्यत्ययाशिवाय यशस्वीपणे पार पडली. सार्वजनिक आरोग्य आणि पोलिओ निर्मूलनाच्या राष्ट्रीय मोहिमेप्रती भारतीय रेल्वेची कटिबद्धता अधोरेखित करत, पात्र मुलांपर्यंत जास्तीत जास्त लसीकरण पोहोचवण्यासाठी 'पल्स पोलिओ लसीकरण कार्यक्रमा'ची पथके अथक परिश्रम घेत आहेत.

# ताम्हिणी घाटात अपघातामध्ये माणगावचे महसूल सहाय्यक अखिल जाधव यांचा मृत्यू

**माणगाव : रामप्रहर वृत्त**

माणगाव तहसील कार्यालय येथील महसूल विभागात कार्यरत असलेले महसूल सहाय्यक अखिल रमेश जाधव (३३) यांचा ताम्हिणी घाटात झालेल्या दुर्दैवी अपघातात मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली.

सविस्तर वृत्त असे की, अखिल जाधव हे यामाहा एफझेड दुचाकीवरून दि. ४ जुलै रोजी माणगावहून पुण्याकडे जात होते. ताम्हिणी घाटातील कोंडेथर गावाच्या हद्दीत सकाळी ८ वा. च्या सुमारास त्यांचे दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने वाहन घसरले. या भीषण अपघातात त्यांना गंभीर दुखापत होऊन त्यांचा मृत्यू झाला अशी प्राथमिक माहिती मिळाली आहे. नुकतीच त्यांची पिंपरी–चिंचवड महानगरपालिकेत निवड झाली होती. या यशाचा आनंद त्यांनी सहकारी व मित्रपरिवारा समवेत पेढे वाटून साजरा केला होता. या अपघाताचा पुढील तपास माणगाव पोलीस करत आहेत.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत त्याचे विद्यमान मालक **श्री. सुनिल किसन जाधव** यांच्याकडून खरेदीखताने कायमस्वरूपी विकत घेण्याबाबतचा व्यवहार आमचे अशिल **१) अरुणकुमार सोहनलाल गुप्ता, २) अंतरिक्षा अरुणकुमार गुप्ता, ३) आशुतोष अरुणकुमार गुप्ता** यांनी ठरविला आहे. त्या व्यवहाराची जाहीर नोटिस देण्याबाबत विद्यमान मालकांनी संमती दिलेली आहे..

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे–चिरनेर, ता–उरण, जि–रायगड**

| अ. क्र. | मौजे | सर्व्हे नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार |
|---|---|---|---|---|
| १) | चिरनेर | १९३/१ | ०.४३.६०<br>पो. ख. ०.०३.५०<br>एकूण ०.४७.१० | ५.१२ |

**एकूण क्षेत्रापैकी प्रस्तावित विरार– अलिबाग बहुद्देशीय मार्गिकेच्या संपादनासाठी अधिसूचित ०.०२.०० (२ गुंठे) क्षेत्र सोडून उर्वरित ०.४५.१० (४५.१० गुंठे) एवढे क्षेत्र हा सदरहू खरेदीखताचा विषय आहे.**

वर वर्णन केलेली मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक यांच्या मालकीची व ताबे कब्जाची आहे. सदरील मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकाने दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविला आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध, बोजा, गहाण, दान, लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनेंस मेहर, कर्ज वगैरे बाबत कसलाही हक्क, हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधितांच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आणून द्यावी. या प्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व नंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही हे सर्वांस कळावे.

सही/–
ॲड. धिरज लहू डाकी
रा.बोरखार, पो. दिघोडे, ता. उरण,
जि–रायगड, मो. नं. ८१०८५४९१८३

उरण
दिनांक : ०५/०७/२०२६


# रेवदंड्याच्या श्री गणेश कला केंद्रात कारागिरांची लगबग

## बाप्पांची मूर्ती घडविण्यावर मूर्तिकारांचा भर

**रेवदंडा : प्रतिनिधी**



गणेशोत्सव अवघ्या काही आठवड्यांवर येऊन ठेपला असून घराघरांत बाप्पाच्या आगमनाची तयारी सुरू झाली आहे. या तयारीतील सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे श्री गणेशमूर्ती निर्मिती. कार्यशाळेत सध्या मातीच्या सुगंधात कारागिरांची लगबग सुरू असून अनुभवी शिल्पकार भक्तिभावाने विविध आकार व मुद्रांतील गणेशमूर्तींना आकार देत आहेत.

रेवदंडा येथील हरेश्वर मंदिर परिसरातील पूजा आर्ट श्री गणेश कला केंद्राचे संचालक नंदकुमार चुनेकर गेली तब्बल ४० वर्षे श्री गणेश मूर्ती निर्मितीच्या क्षेत्रात कार्यरत आहेत. परंपरा, गुणवत्ता आणि आकर्षक कलाकुसरीच्या बळावर त्यांनी या कला केंद्राची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या हस्तकलेतून साकारलेल्या मूर्तींना रायगडसह परिसरातील हजारो गणेशभक्तांचा वर्षानुवर्षे विश्वास आणि पसंती लाभत आहे.

यंदा माती, रंग, सजावटीचे साहित्य तसेच कारागिरांच्या मजुरीत झालेल्या वाढीमुळे श्री गणेशमूर्तींच्या किमतीत काही प्रमाणात वाढ झाली असल्याची माहिती नंदकुमार चुनेकर यांनी दिली,

मात्र बाप्पावरील भक्ती आणि श्रद्धेमुळे भाविकांकडून मूर्तींसाठी नेहमीप्रमाणेच उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून आगाऊ नोंदणीही सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

पूजा आर्ट श्री गणेश कला केंद्राची विशेष ओळख म्हणजे पारंपरिक शैलीला आधुनिक कलाकुसरीची जोड देत पर्यावरणपूरक शाडूच्या गणेशमूर्तींची निर्मिती. विविध मुद्रांतील आकर्षक मूर्ती, सुबक रंगसंगती आणि बारकाईने केलेले शिल्पकाम यामुळे पंचक्रोशीतील गणेशभक्तांची या कला केंद्राला विशेष पसंती मिळत आहे.

# कै.र.वा. दिघे यांचे भव्य स्मारक खोपोलीत नव्याने उभारणार –नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे

**खोपोली : प्रतिनिधी**

कै.र.वा.दिघे यांनी खोपोलीच्या निसर्ग रम्य वातावरणामध्ये विपुल साहित्य निर्मिती केली. त्यांच्या साहित्यापासून प्रेरणा घेऊन तरुणांनी साहित्य निर्मितीकडे भर दिला पाहिजे. खोपोलीकरांनाच नव्हे तर सर्व साहित्यप्रेमींना प्रेरणा देईल असे दिघे यांचे भव्य स्मारक खोपोलीत नव्याने उभारणार असण्याची घोषणा नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांनी केली

पंत पाटणकर चौकातील कै. र.वा.दिघे स्मारकामध्ये दिघ्यांच्या ४६ व्या पुण्यतिथी निमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात शेंडे बोलत होते. या प्रसंगी व्यासपीठावर र.वा.दिघे यांचे सुपुत्र वामनराव दिघे, स्नुषा आणि कवयित्री उज्वला दिघे, पोलीस निरीक्षक सचिन हिरे,कोमसाप अध्यक्ष प्रकाश राजोपाध्ये, नगरसेविका रेश्मा गायकवाड, माजी उपनगराध्यक्ष राजू गायकवाड, बांधकाम सभापती अनिल सानप, विनायक तेलवणे, अनिता पवार, अश्विनी अत्रे, नलिनी पाटील व्यासपीठावर उपस्थित होते.

प्रारंभी दिघे यांच्या प्रतिमेला मान्यवरांनी पुष्पहार अर्पण केल्यानंतर को.म.सा.प अध्यक्ष प्रकाश राजोपाध्ये यांनी प्रास्ताविकामध्ये संस्थेच्या कार्याची माहिती दिली. त्यानंतर वामनराव दिघे यांनी र.वां.च्या साहित्याचा आढावा घेतला. उज्वला दिघे यांनी श्रद्धांजलीपर कविता सादर केली. पत्रकार नितीन भावे यांनी दिघे यांच्या साहित्यातील पैलू उलगडून दाखवले. माजी नगराध्यक्ष दत्तात्रेय मसुरकर, उल्हास देशमुख, डॉ. भाऊसाहेब नन्नवरे, रेखा कोरे यांचीही भाषणे झाली. नलिनी पाटील यांनी लिहिलेल्या आयुष्याचे इंद्रधनुष्य या पुस्तकाचे प्रकाशन झाले.




## पाहिजेत

( तुमचा अनुभवांचे उत्पनात रुपांतर करा)

सेवानिवृत्त, जेष्ठ, नागरिक, गृहिणी, शिक्षक, बँक कर्मचारी, माजी सैनिक, संस्थापक, स्वयंसेवी संस्था सामाजिक कार्यकर्ते, व्यवसाईकाना मर्यादित संधी

(पूर्णवेळ किंवा अर्धवेळ सोयीनुसार काम करा)

संपर्क क्रमांक :– ९९६७५१४८६१, ९९८७३६६८४१

सही/–
श्रीमती. वैशाली रामकृष्ण ठाकूर.

# भात बियाण्यांची उगवण न झाल्यामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यात गेले तीन चार दिवस धुवाधार कोसळणाऱ्या पावसामुळे उरण तालुक्यातील अनेक गावातील शेतकऱ्यांच्या भाताच्या पेरण्यांची उगवणच झाली नसल्याने शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे मोठे संकट कोसळले असून, वरूण राजावर भरवसा ठेवून शेती करणारा शेतकरी धास्तावला आहे. निसर्गाशी नाते सांगणाऱ्या शेतकऱ्यांना यंदा पावसाने चांगलेच रंग दाखवायला सुरुवात केली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची पुरती वाट लागली आहे.यंदा पावसाला जून महिन्याच्या अगदी अखेरीवर सुरुवात झाली.आधीच उशीर झालेला पाऊस जून महिन्याच्या अखेरीवर पेरणी करण्याच्या योग्यतेचा बरसल्यामुळे शेतकऱ्यांनी खरिपाची भात पेरणी केली.



त्यानंतर पावसाने तीन-चार दिवस दडी मारली होती. भाताची पेरणी केलेल्या राबांना यावेळी पावसाच्या पाण्याची आवश्यकता होती. मात्र भातरोपांच्या उगवणीसाठी दमदार पावसाची गरज नसताना गेले तीन-चार दिवस मुसळधार पाऊस कोसळल्याने भात खाचरे पाण्याने भरून गेली. हे पाणी गेले चार-पाच दिवस शेतात कायम साचून राहिल्यामुळे भाताचे राब अक्षरशः कुजून गेले आहेत. कुठेही एका काडीचीही उगवण न होता भाताचे राब पावसाचा वेग वाढतच राहिल्यामुळे भातरोपे तयार न होताच भात कुजून गेले. महागडी बियाणे शेतकऱ्यांनी खरेदी केली होती. ही बियाणे शेतकऱ्यांनी भातरोपे तयार करण्यासाठी वापरली.मात्र बियाण्यांचे भातच शेतात कुजून गेल्याने, निसर्गाशी नाते सांगणारा शेतकरी आता संकटात सापडला असून शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवले आहे.

आता भात बियाणे केंद्रावर सुद्धा भात बियाणे मिळत नसल्यामुळे तसेच घरातील उरल्या सुरल्या भात बियाण्यांचा देखील शेतकऱ्यांनी वापर केल्यामुळे शेतकऱ्यांना बियाण्याच्या भाताची पंचायत झाली आहे. विशेषताः धुवाधार कोसळणाऱ्या पावसाने या भात बियाणाला उगविण्याची संधीच दिली नाही. त्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांवर शेती ओसाड ठेवण्याची वेळ आली आहे. खरीप हंगामातील भात पेरणीला यंदा जून महिन्यात खरी सुरुवात करता आली नाही. दरवर्षी मृग नक्षत्रात शेतकरी पेरणी करतात .मात्र यंदा पाऊस उशिरा बरसला. त्यामुळे पेरण्या लांबणीवर पडल्या. महागडी बियाणे खरेदी करून अनेक ठिकाणच्या शेतकऱ्यांनी पेरणी केली.मात्र भाताची उगवण व्यवस्थित रित्या न झाल्याने बळीराजा धास्तावला आहे.

अति पावसामुळे भात शेतीची खाचरे भरून गेल्याने रोपांच्या उगवण क्षमतेवर परिणाम झाला असून काही ठिकाणी कोचीतच उगवलेली रोपे फार कमकुवत असल्याचे कृषीमित्र शेतकरी प्रफुल्ल खारपाटील यांनी सांगितले. महागडी बियाणे, वाढत्या मजुरीचे दर आणि भातरोपे कुजून गेल्यामुळे बहुतांशी शेतकरी यंदा भात शेती ओसाड ठेवणार असल्याचे बोलले जात आहे. उरण तालुका हा एकेकाळी भाताचे कोठार म्हणून ओळखला जात असे. परंतु वाढत्या औद्योगिकीकरणामुळे तालुक्यातील भात लागवड क्षेत्र कमी झाले आहे. उरण तालुक्यात आजही पारंपारिक पद्धतीने भातशेती केली जाते. मात्र पावसामुळे काही ठिकाणी खरीप हंगामातील भात पेरणी हवी तशी न झाल्यामुळे भातरोपे उगवलीच नाही. धूळपेरणीला संधी न मिळाल्यामुळे जी उन्हाची उब महत्त्वाची आहे. ती उब शेतात साचलेल्या पाण्यामुळे मिळाली नाही. त्यामुळे भात रोपांची अवस्था फार बिकट आहे.

## गर्भवती महिला मृत्यूप्रकरणी इंजेक्शन्सचे नमुने अन्न व औषध प्रशासनाकडे सादर

**नवी मुंबई : बातमीदार**

ऐरोली येथील राजमाता जिजाऊ सार्वजनिक रुग्णालयात उपचारादरम्यान गर्भवती सोनम डोंगरे यांच्या मृत्यूनंतर उपचार प्रक्रियेबरोबरच वापरण्यात आलेल्या औषधांच्या गुणवत्तेचीही तपासणी सुरू करण्यात आली आहे. या प्रकरणात वापरण्यात आलेल्या ड्युवाडिलन आणि डेक्सा मेथासोन या दोन्ही इंजेक्शनचा वापर तात्काळ थांबविण्यात आला आहे. रुग्णालयातील उपलब्ध साठा सीलबंद करून इंजेक्शनचे नमुने पुढील प्रयोगशाळा तपासणीसाठी ठाणे येथील अन्न व औषध प्रशासनाकडे पाठविण्यात आल्याची माहिती महापालिका प्रशासनाने दिली आहे.

३० जून आणि १ जुलै रोजी सोनम डोंगरे व रिचा मिश्रा या आठ महिन्यांच्या गर्भवती महिलांवर उपचारादरम्यान संबंधित इंजेक्शनचा वापर करण्यात आला होता. त्यानंतर दोघींचीही प्रकृती गंभीर झाली. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना व्हेंटिलेटरवर ठेवून उपचार केले. मात्र, उपचारादरम्यान सोनम डोंगरे यांचा मृत्यू झाला, तर रिचा मिश्रा यांना पुढील उपचारासाठी वाशी येथील फोर्टिस रुग्णालयात हलविण्यात आले. महापालिकेच्या माहितीनुसार त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होत आहे. आयुक्तांकडून सातत्याने प्रकृतीबाबत माहिती घेतली जात आहे. या घटनेनंतर मृत्यूच्या कारणांबाबत विविध शक्यता तपासल्या जात असून औषधांच्या गुणवत्तेबाबत कोणताही संशय राहू नये, यासाठी संबंधित इंजेक्शनचा संपूर्ण साठा सीलबंद करण्यात आला आहे. या औषधांचे नमुने अन्न व औषध प्रशासनाकडे पाठविण्यात आले असून प्रयोगशाळेच्या अहवालानंतर औषधांच्या गुणवत्तेबाबत स्पष्टता येणार आहे.

या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक, सर जे. जे. समूह रुग्णालय व ग्रँट वैद्यकीय महाविद्यालयातील स्त्रीरोग व प्रसूती विभागप्रमुख, नवी मुंबई स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र संघटनेचे प्रतिनिधी तसेच महापालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांची समिती नियुक्त करण्यात आली आहे. या समितीला १५ दिवसांत अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## पद्मश्री अनुप जलोटा यांच्या हस्ते 'भक्ती का महासागर' ग्रंथाचे प्रकाशन



**नवी मुंबई : बातमीदार**

प्रख्यात गायक विराग मधुमालती यांच्या 'भक्ती का महासागर' या अद्विवतीय ग्रंथाचे प्रकाशन आज शिकारा हॉटेल, सानपाडा येथे पार पडले. भगवान भैरवांवरील १,१०७ मौलिक भक्तिगीतांचा समावेश असलेल्या या ग्रंथाचे प्रकाशन भारताचे सुप्रसिद्ध भजनसम्राट पद्मश्री अनुप जलोटा व मेघराज राजे भोसले, अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ यांच्या हस्ते करण्यात आले. वंदना वानखडे, मोतीलाल जैन, अर्जुन सिंघवी, निलेश सोमाणी यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

अवघ्या एका वर्षात भगवान भैरवांवरील १,१०७ मौलिक भक्तिगीते लिहिल्याबद्दल वर्ल्ड रेकॉर्ड्स बुक ऑफ इंडियाने त्यांच्या कार्याची "एका वर्षात सर्वाधिक गीते लिहिण्याचा" विश्वविक्रम म्हणून नोंद घेतली असून, हा विराग मधुमालती यांचा ९वा विश्वविक्रम ठरला आहे. यावेळी पद्मश्री अनुप जलोटा म्हणाले, "विराग मधुमालती यांनी भगवान भैरवांवरील भक्तिगीते लिहून भक्ती, श्रद्धा आणि साहित्य क्षेत्रात अद्वितीय कार्य केले आहे. विराग

मधुमालती यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, "हा ग्रंथ माझ्यासाठी केवळ पुस्तक नाही, तर भगवान भैरवांच्या चरणी अर्पण केलेली भक्ती आहे. हा सन्मान माझा नसून प्रत्येक भक्ताचा आहे, ज्यांच्या श्रद्धेने मला ही साधना पूर्ण करण्याची प्रेरणा दिली."

## नेरूळ गावात गटाराचे पाणी रस्त्यावर; साथीच्या आजारांचा धोका!

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईतील नेरूळ गाव, सेक्टर २० परिसरातील कलश संकल्प टॉवरच्या मागील बाजूस तसेच स्वामी समर्थ कृपा इमारती समोरील गटारातील सांडपाणी थेट रस्त्यावर वाहत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. अनेक दिवसांपासून ही समस्या अधूनमधून उद्भवत असून, संबंधित प्रशासनाकडून याकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.



गेली काही दिवसांपासून निर्माण झालेली समस्या मान्सून पूर्व कामांमधील नालेसफाईत कायमची दूर होईल अशी अशा येथील नागरिकांना होती. मात्र तसे न झाल्याने स्थानिक नागरिकांनी पालिकेच्या नालेसफाई कामावर आक्षेप घेत प्रचंड नाराजी व्यक्त केली आहे.

परिसरातील अंतर्गत रस्त्यांवर गटाराचे घाण पाणी सतत वाहत असल्यामुळे सर्वत्र अस्वच्छता आणि दुर्गंधी पसरली आहे. नागरिकांना रोज याच घाण पाण्यातून ये-जा करावी लागत असल्याने त्यांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. विशेषतः डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढल्याने मलेरिया, डेंग्यू, चिकनगुनिया यांसारख्या साथीच्या आजारांचा धोका वाढल्याची भीती नागरिक व्यक्त करत आहेत.

या समस्येचा सर्वाधिक फटका लहान मुले, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना बसत आहे. पावसापाण्याच्या दिवसांमध्ये रस्त्यावर वाहत असलेल्या गटारातील घाण पाण्यातून चालत घरी जावे लागत असल्याने संसर्गजन्य आजारांचा धोका अधिक वाढत आहे. एकीकडे प्रशासन नागरिकांना आजारापासून दूर ठेवण्यासाठी आरोग्य शिबीर घेते, मात्र ज्या प्रकारांमळे आजार निर्माण होतात. त्याकडे दुर्लक्ष करत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण आहे.

महापालिकेकडून करण्यात आलेल्या मान्सूनपूर्व कामांबाबत तीव्र आक्षेप नोंदवत या समस्येवर केवळ तात्पुरत्या स्वरूपात उपाययोजना केल्या जातात. त्यामुळे कायमस्वरूपी तोडगा काढण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

## माजी सैनिक राजेंद्र शिंदे सेवानिवृत्त

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र शासनाच्या कोकण भवन येथील वस्तू व सेवा कर विभागात राज्यकर अधिकारी म्हणून कार्यरत असलेले राज्यकर अधिकारी राजेंद्र बारकू शिंदे हे नियत वयोमानानुसार ३० जून रोजी सेवानिवृत्त झाले. त्याप्रसंगी त्यांना त्यांच्या विभागातर्फे कोकण विभागीय सभागृहात निरोप समारंभ करण्यात आला होता. या समारंभाला अनेक उच्च पदस्थ अधिकारी उपस्थित होते. त्या सर्वांनी राजेंद्र शिंदे यांचे "कार्यपूर्ती "आणि "सहकाऱ्यांना मदत" या गुणाचे खास कौतुक केले.



विशेष म्हणजे जून १९८६ ते ३० जून २००६ या कालावधीत त्यांनी भारतीय हवाई दलामध्ये कार्यरत राहून देशाची सेवा केली. तदनंतर ०५ जानेवारी २००९ ते ३० जून २०२६ या कालावधीमध्ये वस्तू व सेवा कर विभागांमध्ये अनेक शाखांमध्ये काम केले. त्यांच्या मनमिळाऊ स्वभाव आणि कोणत्याही क्लिष्ट प्रकरणात योग्य तो निर्णय घेणारे म्हणून ते सर्वांना परिचित होते. यासाठी राजेंद्र शिंदे यांना सेवानिवृत्तीच्या दिवशी अनेक जणांनी पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी राजेंद्र शिंदे यांनी बहीण वंदना व सीमा,भाऊ संजीव आणि पत्नी अश्विनी व मुलगी समृद्धी यांनी दिलेल्या सहकार्यामुळेच जीवनात यशस्वी झालो असे नमूद केले. सेवानिवृत्तीच्या दिवशी रायगड पॉवरलिफ्टिंगचे सचिव अरुण पाटकर व परिवाराने सुध्दा त्यांना शुभेच्छा दिल्या .



## नाला तुंबल्याने रस्त्यावर पाणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरूळ सेक्टर ६ येथील वरुणा ते दत्तगुरु सोसायटी परिसरातील नाला तुंबल्यामुळे पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात रस्त्यावर साचले असून नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. वाहनचालक, पादचारी तसेच स्थानिक रहिवाशांना ये-जा करताना अडचणी निर्माण होत असून वाहतुकीवरही परिणाम झाला आहे.

या गंभीर समस्येची दखल घेत शिवसैनिक महादेव पवार शिंदे गट यांनी नवी मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांकडे तात्काळ नाल्याची संपूर्ण साफसफाई करून पाण्याचा निचरा करण्याची मागणी केली आहे. तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पाहणी करून कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, जेणेकरून नागरिकांना वारंवार अशा समस्यांना सामोरे जावे लागू नये, अशीही मागणी त्यांनी केली आहे.

## बेलापूरच्या मुख्य रस्त्यावर नित्याची वाहतूक कोंडी

**नवी मुंबई : बातमीदार**

बेलापूर येथील सेक्टर ११ ते १५ या मुख्य मार्गावर दररोज होणाऱ्या भीषण वाहतूक कोंडीमुळे स्थानिक नागरिकांसह शाळकरी विद्यार्थ्यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. अवघ्या पाच मिनिटांचा प्रवास करण्यासाठी सकाळी तसेच दुपार ते सायंकाळच्या गर्दीच्या वेळेत तब्बल ३० ते ४५ मिनिटे लागत असल्याने पालक, विद्यार्थी आणि वाहनचालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.



या मार्गालगत अनेक हॉटेल्स, बार, वाईन शॉप्स, विविध व्यावसायिक आस्थापना तसेच अनेक शासकीय कार्यालये आहेत. त्यामुळे दिवसभर वाहनांची मोठी वर्दळ असते. अनेक ठिकाणी रस्त्याच्या कडेला होणारे पार्किंग, ग्राहकांची वाहने, रिक्षा-टॅक्सींची गर्दी आणि वाढती वाहनसंख्या यामुळे वाहतुकीचा वेग पूर्णपणे मंदावतो. परिणामी या मार्गावर दररोज वाहतूक कोंडी निर्माण होत असून त्याचा सर्वाधिक फटका बेलापूर, सिवूड आणि नेरुळ परिसरातील शाळांमध्ये ये-जा करणाऱ्या विद्यार्थ्यांना बसत आहे.

स्थानिक नागरिक, शालेय विद्यार्थी वाहनचालक आणि पालकांनी वाहतूक पोलिसांनी विशेषतः दुपार ते सायंकाळच्या शालेय वेळेत अतिरिक्त मनुष्यबळ तैनात करावे, बेकायदा पार्किंगवर कठोर कारवाई करावी, रस्त्यालगतच्या व्यावसायिक आस्थापनांमुळे निर्माण होणाऱ्या वाहतुकीचे नियोजन करावे आणि या मार्गावरील कोंडी कायमस्वरूपी दूर करण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात कारण अनेकदा महत्वाच्या शैक्षणिक उपक्रमांच्या वेळी होणारा उशीर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर परिणाम करणारा ठरत असल्याची चिंता पालक व्यक्त करत आहेत.

दरम्यान, या मार्गावरील वाहतूक व्यवस्थापनाचे नियोजन, बेकायदा पार्किंगवर नियंत्रण आणि गर्दीच्या वेळेत प्रभावी पोलीस बंदोबस्त ठेवावा, अशी मागणी रमेश कोळी-नाखवा यांनी केली आहे.

## गव्हाण विद्यालयाच्या रुद्र पाटील आणि अरबाज खानला शिष्यवृत्ती



रुद्र उदय पाटील  अरबाज आजम खान

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या वतीने फेब्रुवारी २०२६ मध्ये संपन्न झालेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती अर्थात इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ.भगत ज्युनिअर कॉलेजमधील रुद्र उदय पाटील आणि अरबाज आजम खान हे दोन विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले.

पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये झालेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये विद्यालयाचे सहा विद्यार्थी पात्र ठरले होते.त्यापैकी हे दोन विद्यार्थी गुणवत्ता यादीत आल्याने शिष्यवृत्तीधारक ठरले आहेत.

रुद्र उदय पाटील व अरबाज आजम खान यांनी शिष्यवृत्तीधारक होवून विद्यालयाची मान उंचावली असून त्यांच्या या यशाबद्दल विद्यालयाचे आधारस्तंभ व रयत शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन तथा संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत, ज्युनिअर कॉलेज स्थानिक शाळा समितीचे सदस्य व संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय.टी.देशमुख, स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी,ज्युनिअर कॉलेज स्थानिक शाळा समितीचे सदस्य विजयशेठ घरत व ॲड.राहुल घरत, विद्यालयाच्या प्राचार्या व लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे,पर्यवेक्षिका शशिकला पाटील,ज्येष्ठ शिक्षक व संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रवींद्र भोईर, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, शिष्यवृत्ती विभाग प्रमुख संपदा म्हात्रे,ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख संजय उगले, गुरुकुल प्रमुख संदीप भोईर व ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे आदींनी अभिनंदन केले.

या शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांसह विद्यालयाच्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा विभागाच्या प्रमुख संपदा म्हात्रे, सहायक विशांत ठाकूर व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या इतर सर्व अध्यापकांचेही सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.

## पाम बीच रोडच्या वॉकिंग ट्रॅकवरील धोकादायक झाडांची छाटणी करण्याची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

पाम बीच रोडलगत असलेल्या वॉकिंग ट्रॅकवरील अनेक मोठी झाडे धोकादायक अवस्थेत असून ती कधीही कोसळण्याची शक्यता आहे. या मार्गावर दररोज मोठ्या संख्येने नागरिक, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुले फिरण्यासाठी येत असल्याने मोठा अपघात होण्याची भीती व्यक्त होत आहे.



अलीकडेच चेंबूर येथे झाड कोसळून एका चिमुकल्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली होती. अशा प्रकारची घटना नवी मुंबईत घडू नये, यासाठी पाम बीच रोडलगतच्या संपूर्ण वॉकिंग ट्रॅकवरील सर्व झाडांची तातडीने पाहणी करून धोकादायक झाडांची छाटणी किंवा आवश्यकतेनुसार तोड करण्याची मागणी स्थानिकांनी नेरुळ वार्ड अधिकाऱ्यांकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

वेळेत योग्य ती कार्यवाही न झाल्यास भविष्यात कोणतीही दुर्घटना घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित अधिकारी व प्रशासनाची राहील, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

## ५५९ मेट्रिक टन इंडस्ट्रियल युरिया प्रकरणात लोना इंडस्ट्रीजवर गुन्हा

### निष्पक्ष चौकशी करावी -लोना कंपनी

**रसायनी : प्रतिनिधी**

रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील लाडिवली येथील लोना इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या गोडाऊनमध्ये ठेवण्यात आलेल्या ५५९ मेट्रिक टन इंडस्ट्रियल युरिया प्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आल्याने औद्योगिक आणि कृषी क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.

कृषी विभागाच्या माहितीनुसार पनवेल तालुक्यातील लाडवली येथील लोना इंडस्ट्रीजच्या गोडाऊनमध्ये ठेवलेल्या ५५९ मेट्रिक टन इंडस्ट्रियल युरिया साठ्यातून अधिकाऱ्यांनी नमुने संकलित केले होते. हे नमुने खत चाचणी प्रयोगशाळा नाशिक येथे तपासणीसाठी पाठविण्यात आले. प्रयोगशाळेकडून प्राप्त झालेल्या अधिकृत अहवालानुसार संबंधित नमुन्यामध्ये शासकीय अनुदानित निम-कोटेड युरिया असल्याचे निष्पन्न झाल्याचा दावा करण्यात आला असून त्यानुसार कंपनीने औद्योगिक वापराच्या नावाखाली शासकीय अनुदानित निम-कोटेड युरियाचा अनधिकृत वापर करून आर्थिक फायदा मिळविण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणी २ जुलै रोजी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाची फिर्याद पनवेल येथील गुन्हा नियंत्रण कृषी अधिकारी कार्यालयातील कृषी अधिकारी तानाजी दोलतोडे यांनी दिली असून पुढील तपास रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक अभिजीत भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

दरम्यान, गुन्हा दाखल झाल्यानंतर लोना इंडस्ट्रीज कंपनीने प्रसिद्ध केलेल्या खुलाशात सर्व आरोप फेटाळून लावत आपल्यावरील आरोप बिनबुडाचे असून संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष पारदर्शक आणि सखोल चौकशीची मागणी केली आहे.

# पेण तालुक्यातील प्रत्येक गावच्या विकासासाठी तत्पर -सभापती वैकुंठ पाटील





**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील कणे गावातील रायगड जिल्हा परिषद शाळेच्या विकासासाठी जिल्हा नियोजन निधीतून सात लाख रुपयांचा निधी मंजूर करून दिल्याबद्दल कृषी व पशुसंवर्धन सभापती वैकुंठ पाटील यांच्या सत्काराच्या कार्यक्रमाचे आयोजन कणे येथे शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले होते.

यावेळी सभापती वैकुंठ पाटील यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, अनेक वर्षापासून सरकारी अधिकारी, शिक्षक, पोलिस, सैनिक, खेळाडू, कलाकार या गावाने तयार केले आहेत. शाळा नव्हे तर येथील पूर्ण विकासासाठी मी नेहमी तुमच्या बरोबर आहे, कृषी विभागातून शेतकऱ्यांना सरकारी योजना मिळून शेतकरी प्रगत व्हावा यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. ज्या भागाने मला निवडून दिले त्या भागाचा, तालुक्याचा, मतदारसंघाचा, जिल्ह्याचा, विकास करणे माझे आद्य कर्तव्य आहे. यापुढे राजिपची एकही शाळा शैक्षणिक विकासापासून वंचित राहणार नाही, असा विश्वास यावेळी पाटील यांनी दिला तसेच जागा उपलब्ध झाल्यास येथील शाळेसाठी सुसज्ज इमारत करण्यात येईल, तर पाण्याचा प्रश्नही सोडवण्यासाठी निश्चितच प्रयत्न करण्यात येतील, असे सांगितले.

राजेंद्र म्हात्रे यांनी बोलताना, कृषी व पशुसंवर्धन या मिळालेल्या पदाचे सोने करून हा विभागदेखील विकासात्मक चांगले काम करू शकतो हे सर्वांना कमी वेळात सभापती वैकुंठ पाटील यांनी दाखवून दिले आहे. यापुढेही त्यांनी येथील समस्या, विकासात्मक मूलभूत सुविधा पूर्ण करून पुढील आमदार, मंत्री व्हावे अशी इच्छा प्रकट केली.

कार्यक्रमास सरपंच संगिता पाटील, उपसरपंच निकिता म्हात्रे, केंद्रप्रमुख राजाराम म्हात्रे, स्कूल कमिटी अध्यक्ष निलेश पाटील, जनार्दन म्हात्रे, रुपाली म्हात्रे, रामदास पाटील, बाळाराम पाटील, चेअरमन संभाजी पाटील, राजेंद्र म्हात्रे, अनिल पाटील, संजय पाटील, माजी सरपंच जयवंत बांधणकर, आर.एन. पाटील, मुख्याध्यापिका आश्लेषा पाटील, शाळा कमिटी, शिक्षक वर्ग, ग्रामस्थ तसेच सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल पाटील यांनी केले.

शाळेतील तीन वर्ग फॉल सिलिंग करणे, शाळा डिजीटल करणे, वर्गातील भिंतींना सिलिंगपर्यंत लादी मारणे, सोलर पॅनल उपलब्ध करुन देणे, समोरील खिडक्यांच्या ग्रीन नेटऐवजी स्लायडींग करणे, तीन स्मार्ट बोर्ड, शाळा सुशोभिकरण करणे, थ्रीडी पेंटींग, मुख्याध्यापक कार्यालय सुशोभीकरण, स्लाइडिंग, सॅनिटरी नॅपकिन डिस्ट्रॉयर मशीन तसेच शाळा दुरुस्ती कामात समोरील भिंतीचे प्लास्टर काढून नवीन प्लास्टर करून लादी मारणे, मागील भिंतीचे खराब प्लास्टर काढून नवीन करणे, परिसर सुशोभीकरण करणे, स्पर्धा परीक्षांसाठीचे नियोजन करणे आदी कामे निधीतून करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

# बेलवडे येथे कृषीदिनी प्रगतशील शेतकऱ्यांचा सन्मान



**पेण : प्रतिनिधी**

हरित क्रांतीचे प्रणेते तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त पेण पंचायत समिती आणि महाराष्ट्र शासन कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने बेलवडे येथील हनुमान मंदिर प्रांगणात कृषी दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाला माजी खासदार धैर्यशील पाटील, पंचायत समितीचे सभापती बाळाराम पाटील, उपसभापती संजय डंगर, गटविकास अधिकारी गजानन लेंडी, पंचायत समिती सदस्य विवेक म्हात्रे, मेघना पाटील, अस्मिता पाटील, सुशांत खाकर, सरपंच हरेश पाटील, उपसरपंच अश्विनी पाटील, कृषी विभागाचे अधिकारी, ग्रामपंचायत सदस्य तसेच पंचक्रोशीतील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी माजी खासदार धैर्यशील पाटील यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती अधिक उत्पादन घेण्याचे आवाहन केले. शासनाच्या विविध कृषी योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी अधिकारी व कार्यकर्त्यांनी समन्वयाने काम करावे, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात कृषी विभागाने विविध शासकीय योजनांची माहिती, अर्ज भरण्याची सुविधा, मोफत बियाणे वाटप व वृक्षलागवडीबाबत मार्गदर्शन केले. कृषी माहिती पुस्तिका २०२६-२७चे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. भातपीक स्पर्धा २०२५-२६ अंतर्गत चारसूत्री पद्धतीने भातशेती करणाऱ्या शेतकऱ्यांचा गौरव करण्यात आला. यामध्ये पंढरीनाथ जठार (गागोदे), रोहिदास पाटील (अंतोरे), केशव खताळ (वरवणे) आणि महादो सुतक (आधारणे) या शेतकऱ्यांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

उपसभापती संजय डंगर यांनी स्वतःच्या निधीतून तयार केलेल्या भाजीपाला बियाणे मिनी किटचे उपस्थित शेतकऱ्यांना वाटप केले. शासनाच्या कृषी व पशुसंवर्धन योजनांचा लाभ प्रत्येक शेतकऱ्याच्या घरापर्यंत पोहचविण्यास प्रशासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. सूत्रसंचालन केतन पाटील यांनी केले. कार्यक्रमाला बेलवडे ग्रामस्थ व पंचक्रोशीतील शेतकरी हजर होते.

# कृषी दिनानिमित्त कशेणे येथे वृक्षारोपण; 'ऑक्सिजन पार्क' संकल्पनेचा प्रारंभ

**माणगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र कृषी दिन तथा माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीचे औचित्य साधून कशेणे गावात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा उपक्रम कृषी विज्ञान केंद्र रोहा आणि श्री हनुमान शेतकरी विकास गट कशेणे यांच्या संयुक्त विद्यमाने उत्साहात पार पडला.



पर्यावरण संवर्धन आणि भविष्यात कशेणे परिसर 'ऑक्सिजन पार्क' म्हणून विकसित करण्याच्या उद्देशाने कडुलिंबाच्या झाडांची यावेळी मोठ्या प्रमाणावर लागवड करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात कोळवणकर यांच्या नर्सरीपासून झाली. त्यानंतर ग्रुप ग्रामपंचायत तळाशेतचे प्रांगण, जिल्हा परिषद रुग्णालय इंदापूर, कालवा परिसर तसेच जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात कडुलिंबाची झाडे लावण्यात आली.

यावेळी शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एक झाड वाढविण्याची जबाबदारी स्वीकारत पर्यावरण संवर्धनाची शपथ घेतली तसेच उपस्थित ग्रामस्थांना त्यांच्या परसबागेत लागवड करण्यासाठी प्रत्येकी एक रोप मोफत वितरित करण्यात आले.

या कार्यक्रमास पंचायत समितीचे सभापती विलास शिंदे, उपसभापती मनीषा मालोरे, माजी जिल्हा परिषद सदस्य संदेश मालोरे, कृषी विज्ञान केंद्र रोहा येथील शास्त्रज्ञांची टीम तसेच कशेणे गावातील शेतकरी, ग्रामस्थ आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नागोठणे ग्रामपंचायतीत आमदार अनिकेत तटकरे यांचा अभिनंदनाचा ठराव

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे ग्रामपंचायतीच्या जून महिन्याच्या मासिक सभेत स्थानिक स्वराज्य संस्था कोकण विभागातून विधान परिषदेवर बिनविरोध निवड झाल्याबद्दल आमदार अनिकेत तटकरे यांचे अभिनंदन करणारा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

ग्रामपंचायतीच्या कै. शैलेंद्र देशपांडे सभागृहात आयोजित मासिक सभेत हा अभिनंदनाचा ठराव पारित करण्यात आला. ठरावाद्वारे नागोठणे ग्रामपंचायतीतर्फे आमदार तटकरे यांचे अभिनंदन करण्यात आले असून त्यांच्या पुढील राजकीय व सामाजिक वाटचालीस शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या.



या अभिनंदन ठरावाचे सूचक माजी सरपंच विद्यमान सदस्य डॉ. मिलिंद धात्रक होते, तर उपसरपंच ज्ञानेश्वर साळुंखे आणि माजी उपसरपंच अखलाक पानसरे यांनी ठरावास अनुमोदन दिले. उपस्थित सर्व सदस्यांनी ठरावाला एकमताने मंजुरी दिली.

यावेळी ग्रामपंचायतीच्या सरपंच सुप्रिया महाडिक, सदस्य संतोष नागोठणेकर, सुप्रिया काकडे, शबाना मुल्ला, अमृता महाडिक, भाविका गिजे, ज्योती राऊत, पूनम काळे, विनिता पाटील, सुलताना लंबाते, शहनाज अधिकारी, जन्नत कुरेशी तसेच ग्रामपंचायत अधिकारी राकेश टेमघरे उपस्थित होते.

# मुरूड पंचायत समिती आवारात रोप लागवड

**मुरूड : प्रतिनिधी**

कृषी दिनाचे औचित्य साधून मुरूड तालुका पंचायत समितीच्या वतीने समितीच्या आवारात रोप लागवडीचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत विविध रोपांची यावेळी लागवड करण्यात आली.

या कार्यक्रमास पंचायत समितीचे सभापती निलेश घाटवळ, गटविकास अधिकारी डॉ. खताळ, एकात्मिक बाल विकास सेवा विभागाचे प्रमुख श्री. शेडगे, तालुका कृषी अधिकारी नराळे यांच्यासह कृषी विभागातील अधिकारी, कर्मचारी तसेच तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मान्यवरांनी उपस्थितांना अधिकाधिक रोपांची लागवड करून त्यांचे संगोपन करण्याचे आवाहन केले. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षांचे महत्त्व अधोरेखित करत प्रत्येकाने किमान एक रोप लावून त्याचे संवर्धन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.



# प्रभारी विस्तार अधिकारी महेश कवळे सेवानिवृत्त



**मुरूड : प्रतिनिधी**

शिक्षण विभाग मुरूडचे प्रभारी विस्तार अधिकारी तथा केंद्रप्रमुख महेश कवळे हे ३५ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्त झाले. त्यांच्या सेवाकाळात त्यांनी सहाय्यक शिक्षक, पदवीधर शिक्षक, केंद्रप्रमुख आणि प्रभारी विस्तार अधिकारी अशा विविध जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडल्या.

कवळे यांच्या सेवानिवृत्ती समारंभास पंचायत समितीचे सभापती निलेश घाटवळ, उपसभापती अश्विनी जंगम, जिल्हा परिषद सदस्य ज्योती नागावकर, पंचायत समिती सदस्य अ‍ॅड. अश्विनी डोंगरीकर ठाकूर, दिनेश नाक्ती, गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी, माजी सभापती रमेश नागावकर, अ‍ॅड. मोहनीश ठाकूर, बोर्ली सरपंच सपना जायपाटील यांच्यासह शिक्षक, कुटुंबीय, हितचिंतक बहुसंख्येने उपस्थित होते.

कायद्याचे पदवीधर असलेले कवळे हे उत्तम वक्ते, व्याकरण व मुद्रितशोधातील अभ्यासक व साहित्य क्षेत्रातील जाणकार म्हणून परिचित आहेत. त्यांनी विविध विषयांवर लेखन केले असून त्यांचे अनेक लेख प्रकाशित झाले आहेत. याशिवाय सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात ते सक्रिय असतात. त्यांना यावेळी उपस्थितांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र नाईक आणि जगदीश चवरकर यांनी केले.

# एम.बी. मोरे स्कूलमध्ये फॅशन डिझायनिंग प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन

**रोहा : प्रतिनिधी**

एम.बी. मोरे फाऊंडेशनच्या धाटाव येथील इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये रिव्हिया फाउंडेशन मुंबई यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांसाठी फॅशन डिझायनिंग प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन नुकतेच करण्यात आले. इयत्ता पाचवी ते सिनिअर कॉलेजमधील विद्यार्थ्यांसाठी फॅशन डिझायनिंग, शिवणकला व संबंधित कौशल्य देण्यासाठी मोफत प्रशिक्षण येथे लवकरच सुरू होणार आहे.

रिव्हिया फाउंडेशन आणि समता फाउंडेशनच्या पदाधिकारी नम्रता भालेकर, प्रियांका मुंडे, मयूर आहेर यांच्या हस्ते उद्घाटन झाले. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना फॅशन डिझायनिंग, शिवणकला आणि कौशल्याधारित शिक्षणाचे





महत्त्व पटवून देत या क्षेत्रातील करिअरच्या विविध संधींबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, आत्मविश्वास आणि स्वयंरोजगाराची क्षमता विकसित करण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रशिक्षणाद्वारे शाळा, ज्युनिअर व सिनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांना फॅशन डिझायनिंग, शिवणकला तसेच विविध व्यावहारिक कौशल्यांचे प्रशिक्षण देण्यात येणार असून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी हा उपक्रम निश्चितच उपयुक्त ठरणार आहे. परिसरातील गरजू महिलांनाही हे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

कार्यक्रमास शाळेच्या मुख्याध्यापिका तेजल सावंत, ज्युनिअर व सिनिअर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रसन्न म्हसळकर, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# मुरूड जंजिरा नगर परिषदेतर्फे फिजिओथेरपी कॅम्प; नागरिकांचा प्रतिसाद

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड जंजिरा नगर परिषद व डॉ.एन.वाय. तासगावकर कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, कर्जत यांच्या संयुक्त विद्यमाने फिजिओथेरपी कॅम्पचे आयोजन मुरूड शहरातील ग्रामीण रुग्णालय लेडीकुलसुम बेगम, फातिमा बेगम रुग्णालयात करण्यात आले होते. १०२ जणांनी शिबिराचा लाभ घेतला.

यावेळी नगर परिषदेचे आरोग्य व शिक्षण सभापती तथा उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत यांनी डॉक्टरांचे स्वागत करुन फिजिओथेरपी कॅम्पचे उद्घाटन करण्यात आले. शिबिरास पाणीपुरवठा सभापती पांडुरंग आरेकर, बालकल्याण समिती सभापती नगमाना खानजादे, बांधकाम सभापती यास्मिन कादिरी, पर्यटन व नियोजन सभापती रुपेश रणदिवे, नगरसेवक अ‍ॅड. रुपेश पाटील,



मनिष विरुकुड, श्रीकांत खोत, नितीन आंबुर्ले, आदेश दांडेकर, नगरसेविका वेदिका आरेकर, अंकिता गुरव, सुगंधा मकु, प्रशासकीय अधिकारी नंदकुमार आंबतेकर, अरविंद गायकर, सतेज निमकर, कुणाल सतविडकर, प्रकाश आरेकर, स्पोर्ट फिजिओथेरपी डॉक्टर विशाल ढोक, समुदाय फिजोथेरपी डॉक्टर सागरिका पाठक, एमडी मेडिकल डॉक्टर पवन हुडेकर, एमबीबीएस आरथो डिपार्टमेंट डॉक्टर अफान, राहुल भोसले, इंटमाशिप फिजिओथेरपी रमणी केस्कर, अनिकेत कांबळे, वेदिका वोसम, आराधना पांडे, शर्वरी जनरस, मानसी कांबळे आदींसह मान्यवर उपस्थित होते.

यावेळी आरोग्य व शिक्षण सभापती तथा उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत यांनी या शिबिरात मार्गदर्शन करतेवेळी म्हणाले की मानवी जीवन जगत असताना पाठदुखी, मानदुखी, सांधेदुखी आणि स्नायूंच्या विविध समस्या वाढत आहेत अशा विविध अनेक शारीरिक समस्या निर्माण होत आहेत. त्यावर मात करण्यासाठी हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

या फिजिओथेरपी कॅम्पमध्ये रूग्णांची आरोग्य तपासणी अंतर्गत स्नायुंचा त्रास, मणक्याचे सर्व विकार, बाळंतपणानंतरचे व्यायाम, लकवा, सांधेदुखी, संधीवात, पाठदुखी, गुडघेदुखी, फुफ्फुसांचे व्यायाम, क्रीडा इजा, बालरोग स्थिती, मेंदुला झालेली दुखापती यांची तपासणी केली जाणार आहे. आपण आरोग्याची काळजी घेण्यासाठी नियमित व्यायाम, योग्य शारीरिक हालचाली आणि वेळेवर फिजिओथेरपी उपचारांचे महत्त्व आहे. जास्तीत जास्त रुग्णांनी यांचा फायदा घ्यावा, असे आवाहन भगत यांनी केले.

हा कॅम्प नगरसेविका तथा फिजिओथेरपी वेदिका आरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली झाला.

# 'डॉक्टरेट'प्राप्त रवींद्र भुरकुंडे यांचा वनवासी कल्याण आश्रमातर्फे गौरव

**माणगाव : प्रतिनिधी**

कातकरी समाजाच्या शैक्षणिक व सामाजिक इतिहासात अभिमानाची नोंद करणारी उल्लेखनीय कामगिरी करत डॉ. रवींद्र भुरकुंडे यांनी डॉक्टरेट (विद्या वाचस्पती) पदवी संपादन केली आहे. कातकरी समाजातील पहिले विद्या वाचस्पती होण्याचा मान त्यांनी मिळवून समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे.

"कातकरी समाजाचा इतिहास : १९७५ ते २००६" हा डॉ. भुरकुंडे यांच्या संशोधन प्रबंधाचा मुख्य विषय असून कातकरी समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व ऐतिहासिक वाटचालीचा सखोल अभ्यास या



प्रबंधातून करण्यात आला आहे.

वनवासी कल्याण आश्रम कोकण प्रांत कार्यकारिणीच्या वतीने डॉ. रवींद्र भुरकुंडे यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले. त्यांच्या जिद्दीने, अथक परिश्रमाने आणि ज्ञानसाधनेच्या ध्यासाने मिळविलेल्या या यशामुळे संपूर्ण कातकरी समाजाचा गौरव झाला असून समाजातील युवकांना उच्च शिक्षणासाठी प्रेरणा मिळणार आहे.

# केप व्हर्डेने अर्जेंटिनाला झुंजवले



## वोझिन्हाचा शानदार बचाव

या सामन्यात केप व्हर्डेचा गोलरक्षक वोझिन्हाने संपूर्ण सामन्यात १० शानदार बचाव करत अर्जेंटिनाला अनेकदा रोखले. त्याने मेस्सीचे पाच प्रयत्नही निष्फळ ठरवले. विशेषतः जवळून आलेला शॉट, फ्री-किक आणि अतिरिक्त वेळेतील जोरदार फटका रोखत त्याने अर्जेंटिनाला बराच काळ गोलपासून दूर ठेवले. पराभव झाला असला तरी केप व्हर्डेच्या ऐतिहासिक विश्वचषक मोहिमेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

**फ्लोरिडा : वृत्तसंस्था**

फिफा विश्वचषक स्पर्धेत सर्वात मोठा 'डार्क हॉर्स' ठरलेल्या केप व्हर्डेचा प्रेरणादायी प्रवास अखेर संपुष्टात आला. गतविजेता अर्जेंटिनाविरुद्ध अतिरिक्त वेळेपर्यंत रंगलेल्या थरारक सामन्यात केप व्हर्डेला ३-२ असा पराभव स्वीकारावा लागला, मात्र पराभवानंतरही ४० वर्षीय गोलरक्षक वोझिन्हा आणि संपूर्ण केप व्हर्डे संघाने आपल्या लढाऊ खेळाने जगभरातील फुटबॉलप्रेमींची मने जिंकली.


अवघ्या साडेपाच लाख लोकसंख्या असलेल्या या छोट्या बेट राष्ट्राने पहिल्याच विश्वचषकात स्पेन, उरूग्वेसारख्या बलाढ्य संघांना रोखत बाद फेरी गाठली आणि अखेरच्या क्षणापर्यंत अर्जेंटिनालाही विजयासाठी संघर्ष करायला भाग पाडले.

अर्जेंटिनाविरुद्धच्या सामन्यात लिओनेल मेस्सीने गोल करून संघाला आघाडी मिळवून दिली, मात्र केप व्हर्डेने दोनदा बरोबरी साधत सामना अतिरिक्त वेळेत नेला. अखेर १११व्या मिनिटाला क्रिस्टियन रोमेरोच्या हेडरला बचावपटू डिने बोर्जेसचा स्पर्श झाल्याने झालेला स्व-गोल अर्जेंटिनाच्या विजयाचा निर्णायक क्षण ठरला.

या सामन्यात मेस्सीने विश्वचषकातील आपल्या कारकिर्दीतील २०वा गोल नोंदवत आणखी एक ऐतिहासिक टप्पा गाठला. स्पर्धेतील त्याचा हा सातवा गोल असून गोल्डन बूटच्या शर्यतीत तो आघाडीवर कायम आहे. सलग आठ विश्वचषक सामन्यांत गोल करण्याचाही त्याने विक्रम अधिक भक्कम केला.

## नोव्हाक जोकोविचची फेडररच्या विक्रमाशी बरोबरी

**लंडन : वृत्तसंस्था**



विम्बल्डनमध्ये सर्बियाचा दिग्गज टेनिसपटू नोव्हाक जोकोविच आणि गतविजेता यानिक सिनर यांनी प्रभावी कामगिरी करत पुरुष एकेरीच्या १६ संघांच्या फेरीत प्रवेश केला. जोकोविचने विम्बल्डनमध्ये सलग सर्वाधिक वेळा पोहचण्याच्या रॉजर फेडररच्या विक्रमाची बरोबरी केली, तर सिनरने सलग पाचव्यांदा विम्बल्डनच्या अंतिम १६मध्ये पोहचून एक नवीन विक्रम केला.

सात वेळा विम्बल्डन विजेता ठरलेल्या नोव्हाक जोकोविचने फ्रान्सच्या २५व्या मानांकित आर्थर रिंडरनेकचा ७-५, ६-४, १-६, ७-६ (७-४) असा पराभव करून चौथ्या फेरीत प्रवेश केला. या विजयासह ३९ वर्षीय जोकोविचने ऑल इंग्लंड क्लबमध्ये आपल्या कारकिर्दीतील १०५वा विजय नोंदवला आणि विम्बल्डनमध्ये सर्वाधिक सामने जिंकण्याच्या रॉजर फेडररच्या विक्रमाची बरोबरी केली. या विजयासह जोकोविचने ओपन एरामध्ये १८व्यांदा विम्बल्डनच्या राऊंड ऑफ १६मध्ये पोहचून फेडररच्या विक्रमाची बरोबरी केली.

# घानाला नमवून कोलंबिया 'राऊंड १६'मध्ये

**कॅन्सस सिटी (मिसूरी) : वृत्तसंस्था**



जॉन आरियासच्या पहिल्या हाफमधील निर्णायक गोलच्या जोरावर कोलंबियाने घानाचा १-० असा पराभव करत फिफा विश्वचषकाच्या राऊंड ऑफ १६ मध्ये प्रवेश केला. ॲरोहेड स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात कोलंबियाने सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करत विजयावर शिक्कामोर्तब केले.

सामन्याच्या सुरुवातीलाच कोलंबियाला मोठा धक्का बसला. आघाडीचा स्ट्रायकर जॉन कोर्डोबा याला मांडीच्या दुखापतीमुळे मैदान सोडावे लागले. त्याच्या जागी प्रशिक्षक नेस्टर लोरेन्झो यांनी लुईस सुआरेझला मैदानात उतरवले आणि हा निर्णय संघासाठी निर्णायक ठरला.

१४व्या मिनिटाला डॅनियल मुनोजने उजव्या बाजूने केलेल्या चालीनंतर सुआरेझने गोलसमोर अचूक क्रॉस दिला. त्या चेंडूवर झेपावत जॉन आरियासने घानाचा गोलरक्षक लॉरेन्स अती झिगीला चकवत सहज गोल नोंदवला आणि कोलंबियाला १-० अशी आघाडी मिळवून दिली.

यानंतर घानाने बरोबरीसाठी जोरदार प्रयत्न केले. दुसऱ्या हाफमध्ये अनेक आक्रमणे रचली, मात्र कोलंबियाच्या भक्कम बचावफळीने आणि गोलरक्षकाच्या उत्कृष्ट कामगिरीने घानाला यश मिळू दिले नाही. अखेर आरियासचा गोलच सामन्यातील निर्णायक क्षण ठरला.

आता उपांत्यपूर्व फेरीत स्थान मिळवण्यासाठी कोलंबियाचा सामना मंगळवारी कॅनडातील व्हँकुव्हर येथे स्वित्झर्लंडशी होणार आहे. दुसरीकडे घानाचा विश्वचषकातील प्रवास राऊंड ऑफ ३२मध्ये संपुष्टात आला.

# सलाहच्या नेतृत्वाखाली इजिप्तने रचला इतिहास!

## विश्वचषकाच्या बाद फेरीत प्रथमच विजय

**अर्लिंग्टन (टेक्सास) : वृत्तसंस्था**



मोहम्मद सलाहच्या नेतृत्वाखाली इजिप्तने फिफा विश्वचषक स्पर्धेत ऐतिहासिक कामगिरी करत बाद फेरीतील आपल्या पहिल्याच सामन्यात ऑस्ट्रेलियाचा पेनल्टी शूटआऊटमध्ये ४-२ असा पराभव केला. निर्धारित वेळ आणि अतिरिक्त वेळ संपल्यानंतर सामना १-१ असा बरोबरीत राहिल्यावर पेनल्टी शूटआऊटमध्ये इजिप्तने अचूक खेळ करत उपांत्यपूर्व फेरीकडे (राऊंड ऑफ १६) वाटचाल केली.

इजिप्तसाठी हा विजय अनेक अर्थांनी ऐतिहासिक ठरला. विश्वचषकाच्या इतिहासात प्रथमच नॉकआऊट फेरीतील सामना जिंकण्याची किमया त्यांनी साधली. आता राऊंड ऑफ १६मध्ये त्यांचा सामना गतविजेता अर्जेंटिना किंवा केप वर्दे यांच्यापैकी विजेत्या संघाशी होणार आहे.

सामन्याच्या १३व्या मिनिटाला इमाम अशूरने शानदार हेडरद्वारे इजिप्तला आघाडी मिळवून दिली, मात्र ५५व्या मिनिटाला बचावपटू मोहम्मद हानीच्या आत्मघाती गोलमुळे ऑस्ट्रेलियाने १-१ अशी बरोबरी साधली. उर्वरित वेळेत दोन्ही संघांना संधी मिळाल्या, मात्र कोणालाही निर्णायक गोल करता आला नाही.

पेनल्टी शूटआऊटमध्ये ऑस्ट्रेलियाची सुरुवातच खराब झाली. हॅरी साऊटरचा पहिला प्रयत्न गोलपोस्टच्या वर गेला, तर लुकास हेरिंग्टनचा चौथा फटका क्रॉसबारला लागला. इजिप्तकडून महमूद साबेर, रामी राबिया, मोहम्मद सलाह आणि अखेरीस होसाम अब्देलमग्विड यांनी अचूक पेनल्टी मारत संघाला ४-२ असा ऐतिहासिक विजय मिळवून दिला.

लिव्हरपूलचा माजी स्टार मोहम्मद सलाह हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीनंतरही संपूर्ण १२० मिनिटे मैदानावर खेळला. सामन्यानंतर भावना व्यक्त करताना तो म्हणाला, "आजचा दिवस माझ्या आयुष्यातील सर्वोत्तम दिवसांपैकी एक आहे. आमच्या खेळाडूंना आणि चाहत्यांना आनंद साजरा करताना पाहणे यापेक्षा मोठे समाधान नाही." इजिप्तचे प्रशिक्षक होसाम हसन यांनीही खेळाडूंच्या धैर्याचे कौतुक केले.

# मेस्सी जैसा कोई नहीं!

## एक गोलसह तीन विक्रमांना गवसणी

**मियामी गार्डन्स : वृत्तसंस्था**



फिफा वर्ल्डकप स्पर्धेतील केप व्हर्डेविरुद्धच्या लढतीत अर्जेंटिनाचा स्टार फुटबॉलपटू लिओनेल मेस्सीने पहिला गोल डागत संघाला आघाडी मिळवून दिली. एक्स्ट्रा टाइममध्ये निकाली लागलेल्या सामन्यात मेस्सीने फक्त एक गोल केला, पण या गोलसह त्याने गोल्डन बूटच्या शर्यतीत अव्वलस्थानी पोहचण्यासह तीन मोठ्या विक्रमांना गवसणी घातली आहे.

'राउंड ऑफ ३२'मध्ये केप व्हर्डेविरुद्ध मेस्सीने यंदाच्या हंगामातील सातवा गोल डागला. गोल्डन बूटच्या शर्यतीत तो आता अव्वलस्थानी पोहचला आहे. मेस्सीच्या पाठोपाठ फ्रान्सचा किलियन एम्बाप्पेचा नंबर लागतो. त्याने आतापर्यंत सहा गोल केले असून तिसऱ्या स्थानावर नॉर्वेचा एर्लिंग हालंड आणि इंग्लंडचा हॅरी केन प्रत्येकी पाच गोलसह तिसऱ्या स्थानावर आहेत.

केप व्हर्डेविरुद्धच्या गोलसह ३९ वर्षीय मेस्सीने आणखी एका ऐतिहासिक विक्रमाला गवसणी घातली. पुरुष फुटबॉल वर्ल्डकपच्या इतिहासात २० गोल करणारा तो पहिलाच खेळाडू ठरला. यापूर्वीच्या स्पर्धेत त्याने जर्मनचा दिग्गज मिरोस्लाफ क्लोजेला मागे टाकत वर्ल्डकप स्पर्धेत सर्वाधिक गोल करण्याचा डाव साधला होता.

पुरुषांच्या फिफा वर्ल्डकप स्पर्धेत दोन वेगवेगळ्या हंगामात सात किंवा त्याहून अधिक गोल करणारा मेस्सी हा फुटबॉल जगतातील पहिला खेळाडूही ठरला आहे. कतार २०२२मध्ये त्याने सात गोल केले होते आणि आता विश्वचषक २०२६मध्येही त्याने सात गोलचा टप्पा गाठला आहे. केप व्हर्डेच्या संघाविरुद्धच्या सामन्यात मेस्सीने सलग आठ सामन्यात गोल करण्याचा खास विक्रमही आपल्या नावे नोंदवला. कतार २०२२च्या राउंड ऑफ १६पासून प्रत्येक सामन्यात त्याने गोल डागला आहे.

# सिडनी लोपेस कॅब्रालचा मॅजिकल गोल



**फ्लोरिडा : वृत्तसंस्था**

राऊंड ऑफ ३२ फेरीत अर्जेंटिना आणि केप व्हर्डे या संघांतील सामन्यात फिफा वर्ल्डकप स्पर्धेच्या इतिहासातील सर्वात मोठा उलटफेर पहायला मिळाला असता, पण ही संधी थोडक्यात हुकली. या सामन्यात दिग्गज खेळाडू लिओनेल मेस्सीने अनेक मोठे रेकॉर्ड मोडून काढले, पण मेस्सीहून अधिक चर्चा रंगली, ती २३ वर्षीय खेळाडू सिडनी लोपेस कॅब्रालची. या खेळाडूने असा काही भन्नाट गोल केला, ज्याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

सामन्यातील अखेरच्या क्षणी केप व्हर्डेने शेवटी गोल करून अर्जेंटिनाशी बरोबरी केली. हा सामना एक्स्ट्रा टाईममध्ये गेला होता. एक्स्ट्रा टाईमच्या पहिल्या हाफमध्ये सेट पीस मिळाल्यानंतर अर्जेंटिनाकडून लिसांद्रो मार्टिनेझने भन्नाट गोल केला. त्यावेळी असे वाटले होते की, अर्जेंटिनाने या सामन्यावर कब्जा केला आहे. पण सामन्यातील १०३व्या मिनिटाला सिडनी लोपेस कॅब्रालने डाव्या विंगवरून चेंडूचा ताबा मिळवला, अर्जेंटिनाच्या डिफेंडरला चकवले आणि पेनल्टी बॉक्सच्या कडेवरून एक अप्रतिम 'कर्लिंग शॉट' मारत गोल केला. या गोलला 'गोल ऑफ द टूर्नामेंट' असेही म्हटले जात आहे.

सध्या केप व्हर्डे संघाचे प्रतिनिधित्व करत असलेल्या सिडनी लोपेस कॅब्रालचा जन्म १८ सप्टेंबर २००२ रोजी नेदरलँड्समधील रॉटरडॅम येथे झाला. जन्म नेदरलँड्समध्ये झाला असला, तरीदेखील त्याचे वडील हे केप व्हर्डेचे आहेत. त्यामुळे त्याने मातृभूमीकडून आंतरराष्ट्रीय फुटबॉल खेळण्याचा निर्णय घेतला. सामन्यात अर्जेंटिनाने बाजी मारली, पण कॅब्रालच्या गोलची सर्वत्र चर्चा आहे.

# व्लादिमीर क्रॅम्निकवर दोन वर्षांची बंदी



**मॉस्को : वृत्तसंस्था**

जागतिक बुद्धिबळ महासंघाच्या (फिडे) नीती आणि शिस्तपालन आयोगाने (ईडीसी) माजी विश्वविजेता व्लादिमीर क्रॅम्निकवर दोन वर्षांची शिस्तभंगाची बंदी घातली आहे, पण या बंदीचे शेवटचे एक वर्ष तीन वर्षांच्या परिवीक्षा कालावधीसाठी स्थगित केले जाईल. परिवीक्षा कालावधीत क्रॅम्निक कोणत्याही नवीन उल्लंघनासाठी दोषी न आढळल्यास त्याच्यावर केवळ एक वर्षाची सक्रिय बंदी असेल.

फिडे व्यवस्थापन मंडळ आणि फिडे फेअर प्ले आयोगाने दाखल केलेल्या तक्रारींनंतर हे प्रकरण सुरू करण्यात आले. या तक्रारींमध्ये असा आरोप करण्यात आला होता की, क्रॅम्निकने पुरेसा आधार नसताना, ग्रँडमास्टर डेव्हिड नवारा आणि दिवंगत ग्रँडमास्टर डॅनियल नरोडित्स्की यांच्यासह अनेक बुद्धिबळपटूंवर सोशल मीडिया आणि सार्वजनिक मंचांवर फसवणूक केल्याचा जाहीरपणे आरोप केला होता. दरम्यान, फिडेच्या नियमांनुसार, क्रॅम्निक २१ दिवसांच्या आत फिडे नीतिमत्ता आणि शिस्तपालन आयोगाच्या अपील समितीकडे या निर्णयाविरुद्ध अपील करू शकतो.

# 'बीएआय'कडून '३x१५' स्कोअरिंग पद्धतीची अंमलबजावणी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय बॅडमिंटनपटूंना जागतिक स्तरावरील आगामी बदलांसाठी सज्ज करण्यासाठी बॅडमिंटन असोसिएशन ऑफ इंडियाने (बीएआय) एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. जुलै २०२६पासून देशांतर्गत स्पर्धांमध्ये बॅडमिंटन वर्ल्ड फेडरेशनची नवीन '३x१५' स्कोअरिंग पद्धत लागू केली जाणार आहे. याची सुरुवात ७ ते १४ जुलै या काळात एर्नाकुलम (केरळ) येथे होणाऱ्या 'योनेक्स-सनराईज ऑल इंडिया सीनियर रँकिंग बॅडमिंटन टूर्नामेंट'पासून होईल.

बॅडमिंटन वर्ल्ड फेडरेशनने जानेवारी २०२७पासून ही पद्धत जागतिक स्तरावर लागू करण्याचे प्रस्तावित केले आहे. त्याआधीच भारतीय खेळाडूंना या नव्या स्वरूपाची सवय व्हावी आणि त्यांना तांत्रिक व शारीरिकदृष्ट्या तयार राहता यावे हा या निर्णयामागचा मुख्य उद्देश आहे. ही नवीन पद्धत केवळ वरिष्ठ स्तरावरच नव्हे, तर झोनल चॅम्पियनशिप, रँकिंग टूर्नामेंट्स आणि नॅशनल चॅम्पियनशिपमध्ये (अंडर-११ ते सिनियर आणि मास्टर्स/व्हेटरन्स) अनिवार्य असेल. यामुळे संपूर्ण भारतीय बॅडमिंटन इकोसिस्टममध्ये एकवाक्यता येईल.

या निर्णयाबद्दल अधिक माहिती देताना बॅडमिंटन असोसिएशन ऑफ इंडियाचे सरचिटणीस संजय मिश्रा म्हणाले की, याद्वारे सर्व वयोगटातील खेळाडूंना नवीन फॉरमॅटची सवय होईल आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर संक्रमण अधिक सुलभ होईल.

दरम्यान, या बदललेल्या स्वरूपामुळे खेळाची तीव्रता वाढणार असून खेळाडूंना आता अधिक तांत्रिक अचूकता आणि त्वरित निर्णय घेण्याच्या क्षमतेवर भर द्यावा लागणार आहे.

# वैभव सूर्यवंशीला अखेर संधी!

## टीम इंडियात समावेश; सचिनचा विक्रम मोडला



**मँचेस्टर : वृत्तसंस्था**

भारत आणि इंग्लंड यांच्यात सुरू असलेल्या पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील दुसरा सामना शनिवारी (दि.४) मँचेस्टरमध्ये खेळला गेला. या सामन्यात सर्वांचे लक्ष युवा फलंदाज वैभव सूर्यवंशी खेळणार की नाही याकडे लागले होते. सामना सुरू होण्यापूर्वीच उपकर्णधार तिलक वर्मा यांच्या हस्ते त्याला भारतीय संघाची कॅप देण्यात आली आणि त्याच्या आंतरराष्ट्रीय पदार्पणावर शिक्कामोर्तब झाले.

फक्त १५ वर्षे ९९ दिवसांचा वैभव सूर्यवंशी हा आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करणारा सर्वात तरुण भारतीय खेळाडू ठरला आहे. याआधी सचिन तेंडुलकरने १६ वर्षे २०५ दिवस वयात पदार्पण केले होते, मात्र सूर्यवंशीने तो विक्रम मोडत नवा इतिहास रचला आहे.

भारतीय कर्णधार श्रेयस अय्यरने सामन्यापूर्वी प्लेइंग इलेव्हन जाहीर करताना सांगितले की, संघात एक बदल करण्यात आला असून संजू सॅमसनच्या जागी वैभव सूर्यवंशीला संधी देण्यात आली आहे. अय्यरने सांगितले की, वैभव गेल्या काही महिन्यांपासून उत्कृष्ट फॉर्ममध्ये आहे आणि तो दडपण न घेता आक्रमक फलंदाजी करतो. नेट्समध्ये त्याची कामगिरी पाहता तो संघात खेळण्यास पूर्णपणे पात्र आहे. दरम्यान, पहिल्या आंतरराष्ट्रीय सामन्यात वैभव खास कामगिरी करू शकला नाही. १० चेंडूत दोन षटकारांसह १४ धावा करून तो बाद झाला.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com